



# Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai
## Annual Report 1999-2000

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## वार्षिक अहवाल १९९९-२०००




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार श्रीमती आवाबाई वाडिया यांना प्रदान

डावीकडून : श्री ज्ञानेश्वर खैरे, श्री अरुण डहाणूकर, मा. एम्.एस्. स्वामीनाथन, श्री शरद पवार, श्री मोहन धारिया, आवाबाई वाडिया व श्री अरुण गुजराथी.




यशवंतराव चव्हाण राज्य स्तरीय पारितोषिक दिवंगत दादासाहेब रुपवते यांच्या वतीने श्रीमती सुशीलाबाई रुपवते यांना प्रदान.

डावीकडून : श्री मोहन धारिया, श्री शरद पवार, श्री नारायणराव सुर्वे व श्रीमती सुशीलाबाई रुपवते, श्री प्रेमानंद रुपवते व इतर.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दि. सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.ए.एच./बी.ओ.एम-/५३१/८५
जी.बी.बी.एस.डी., दि. ३० जुलै १९८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

## विश्वस्त मंडळ सदस्य

१. मान. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मान. श्री. मोहन धारिया — कार्याध्यक्ष
३. मान. श्री. श.गं. काळे — सरचिटणीस
४. मान. श्री. कमलाकर म्हेत्रे — कोषाध्यक्ष
५. मान. सुधाकरराव नाईक
६. मान. शिवाजीराव पाटील निलंगेकर
७. मान. डॉ. निळकंठराव कल्याणी
८. मान. प्रा.पी.बी. पाटील
९. मान. श्री. राम प्रधान
१०. मान. श्री. गुलाम गौस
११. मान. श्री. लक्ष्मण माने
१२. मान. श्री. वसंतराव कार्लेकर
१३. मान. श्री. ज्ञानेश्वर खैरे
१४. मान. श्री. हुसेन दलवाई
१५. मान. डॉ. रवि बापट
१६.
१७. } महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

## कार्यकारिणी सदस्य

१. मान. श्री. शरदराव पवार
२. मान. श्री. मोहन धारिया
३. मान. श्री. श.गं. काळे
४. मान. श्री. कमलाकर म्हेत्रे
५. मान. डॉ. व्ही. सुब्रमण्यन्
६. मान. डॉ. राम ताकवले
७. मान. श्री. ज्ञानेश्वर खैरे
८. मान. श्री. ना.धों. महानोर
९. मान. श्री. हुसेन दलवाई
१०. मान. श्री. नरेंद्रजी तिडके
११. मान. श्री. एन.के.पी. साळवे
१२. मान. श्री. के.बी. आवाडे
१३. मान. श्री. डॉ. रवि बापट
१४. मान. श्री. गिरीश गांधी
१५. मान. श्री. प्रतापराव भोसले
१६. मान. श्री. शिवाजीराव गि. पाटील
१७. मान. श्री. अप्पासाहेब उर्फ सा.रे. पाटील
१८. मान. श्री. अंकुशराव टोपे
१९. मान. श्री. गोविंदराव निकम
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## कार्यकारी समिती

१. मान. श्री. शरदराव पवार
२. मान. श्री. मोहन धारिया
३. मान. श्री. कमलाकर म्हेत्रे
४. मान. श्री. श.गं. काळे
५. मान. श्री. ज्ञानेश्वर खैरे
६. मान. श्री. हुसेन दलवाई
७. मान. श्री. डॉ. रवि बापट

श्री. त्र्यं.भा. खेडकर - संचालक (प्रशासन)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई
## सन १९९९-२००० चा वार्षिक अहवाल

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा सन १९९९-२००० चा अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कार्यकारी समितीचे कामकाज :**
यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्यांचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत असून त्यांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी समितीच्या बैठका महिन्यातून दोन वेळा घेऊन संबंधित विषयांवर निर्णय घेण्यात येतात. प्रतिष्ठानचे सदस्य, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि विविध विभागांचे प्रमुख नियमितपणे आपापले कामकाज करीत आहेत.

**यशवंतराव चव्हाण केंद्रामधील उपक्रम :**

१. **मुख्य सभागृह** : यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे, कंपन्यांतर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिसंवाद, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदि कार्यक्रमही वर्षभर झाले.

२. **सांस्कृतिक सभागृह** : सभागृहाचा अधिक वापर होण्याच्यादृष्टीने सांस्कृतिक सभागृहाचे नुतनीकरण करण्यात आले असून त्यामध्ये अद्यावत सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. या सभागृहात आता (आर्ट गॅलरी) कलादालन उभारण्यात आले आहे. ललित कलादालनामध्ये अनेक मान्यवर कलाकारांनी रंगचित्रे, छायाचित्रे, रेखाटनचित्रे, पॉटरी यासारख्या हस्तकलेच्या वस्तु यांची विविध प्रदर्शने झाली. नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलादालनातर्फे 'मान्सून शो' तसेच ज्येष्ठ कलाकारांसाठी प्रदर्शने आयोजित करण्यात आली. 'गणेश शो' व शाळकरी मुलांसाठी 'चित्रस्पर्धा' आयोजित करण्यात आली. यामुळे प्रतिष्ठानच्या कलादालनाला चांगली प्रसिध्दी मिळाली. देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या परिषदा, परिसंवाद व चर्चासत्रे घेण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य सभागृह, सांस्कृतिक सभागृह तसेच ललित कलादालन सवलतीच्या दरात देण्यात येतात. कलादालनात उदयोन्मुख कलाकारांना प्राधान्य देण्यात येते. सभागृहाला चांगल्याप्रकारे मागणी येत आहे. तसेच चौथ्या मजल्यावरील परिषद सभागृहाचे नुतनीकरण केल्यापासून त्या सभागृहालाही चांगल्याप्रकारे मागणी येत आहे. सांस्कृतिक सभागृहाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या प्रबोधनासाठी मुख्यत्वेकरुन करण्यात येतो.

३ **सांस्कृतिक विभाग** : प्रतिष्ठानच्या सभागृहात रंगस्वरतर्फे आयोजित करण्यात येणा-या नाट्य, चित्रपट, गायन आदि कार्यक्रमांचा आस्वाद घेण्यासाठी प्रतिष्ठानच्या मान्यवर सदस्यांना तसेच रंगस्वरचे सदस्य होऊ इच्छिणा-या सदस्यांसाठी वार्षिक वर्गणी रुपये.५००/- व पती-पत्नीसाठी रुपये.७५०/- भरुन सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांनाही सवलतीच्या दरात वरील कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी स्वतंत्र सल्लागार समिती व संघटन समिती असून त्यांच्यामार्फत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. यावर्षामध्ये रंगस्वरच्या कार्यक्रमांचा लाभ सभासदांनी घेतला आहे.

४ **यशवंतराव चव्हाण ग्रंथालय** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या अनेक उद्दिष्टांपैकी सुसज्ज ग्रंथालय हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रंथालयात अनेक विषयांवरील ग्रंथ विकत घेतलेले असून त्यामध्ये राज्यशास्त्र, ग्रामीण प्रश्न, पर्यावरण, महाराष्ट्राची संस्कृति व इतिहास, सहकार शिक्षण, स्त्रियांचे प्रश्न, कायदा या विषयांवरील पुस्तके घेतली आहेत. मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी पुस्तके तसेच त्यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके ग्रंथालयात आहेत. शिवाजी विद्यापीठ, प्राज्ञपाठ शाळा, ग्रंथाली, महाराष्ट्र शासन यांनी प्रकाशित केलेली पुस्तके ग्रंथालयासाठी विकत घेतलेली आहेत. त्याचप्रमाणे अनेक विषयांवरील संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. वाचकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिनची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रंथालयामध्ये विविध प्रकारची दैनिके, पाक्षिके, व मासिके इत्यादी दर्जेदार साहित्य वाचकांसाठी ठेवण्यात आले आहे. ग्रंथालयात वाचकांची बसण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर होण्याच्यादृष्टीने सभासद करुन घेण्याचे काम चालू असून वार्षिक वर्गणी रु.२५०/- आकारली जाते. तसेच ग्रंथालयातील पुस्तकांचा कॉलेज विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून सवलतीची वार्षिक वर्गणी रु.२५/- घेतली जाते. महाराष्ट्र शासनाकडून आपल्या ग्रंथालयास मान्यता देण्यात आली असून सन १९९९-२००० सालासाठी रु २९,९६०/- अनुदान दिले आहे.

प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांना ग्रंथालय विनामूल्य उपलब्ध आहे. १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २००० या काळात रु.१,५६,६१०/- किंमतीचे ग्रंथ खरेदी करण्यात आले आहेत. ग्रंथ खरेदीसाठी स्वतंत्र निवड समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीमार्फत ग्रंथ खरेदी केले जातात. ग्रंथालयांतील सर्व पुस्तकांची नोंदणी संगणकावर करण्यात आली आहे.

५ **इंटरनेट प्लाझा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इंटरनेट प्लाझाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.शरद पवार यांच्या शुभहस्ते २६ ऑक्टोबर १९९७ रोजी झाले. इंटरनेट प्लाझामार्फत विविधप्रकारची माहिती आणि दूरवरच्या ठिकाणी संपर्क इंटरनेटद्वारे साधला जातो. जागतिक घडामोडींची माहिती एका जागेवर बसून मिळते. त्याचप्रमाणे इ-मेलद्वारे जगात कुठेही संपर्क साधता येतो. याचा खर्च इतर संपर्क साधनापेक्षा कमी येतो. साधारणपणे १७८ विद्यार्थी आणि व्यवसायिकांनी इंटरनेट प्लाझाचा उपयोग करुन घेतला आहे. प्रतिष्ठानच्या विविध विभागांना आवश्यक असलेली माहिती इंटरनेटमधून एकत्र करुन देण्यात येते- इंटरनेट प्लाझासाठी डॉ.रवि बापट आणि अशोक नाडकर्णी यांचे मार्गदर्शन मिळते. या विभागात जास्तीत विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न चालू आहे.

६ केंद्र इमारतीमधील प्रशिक्षण केंद्र : युरोपियन युनियनशी सहकार्य

युरोपियन युनियनच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, सहकार या सामाजिक क्षेत्राच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. प्रतिष्ठान, महाराष्ट्र शासन, व युरोपियन युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर पंचायत राज प्रशिक्षण उपक्रम युरोपियन युनियनने प्रतिष्ठानला उपलब्ध केलेल्या निधीतून व राज्य शासनाच्या निधीतून कार्यान्वित झाला आहे. तसेच सहकार क्षेत्रातीलल पंचकमिटी सदस्यांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतला आहे. त्यालाही युरोपियन युनियनकडुन आर्थिक मदत अपेक्षित आहे. युरोपियन युनियनद्वारे महाराष्ट्रात निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, त्याची माहिती प्रसिध्द केली आहे. त्याचा फायदा व्यापारी उद्योजकाम होईल- युरोपियन युनियन तर्फे ' इलेक्ट्रॉनिक्स डाटा इंटरचेंज ' मल्टिमॉडल इन्फर्मेशन सेंटर स्थापन करण्यात आले असुन त्यामधुन भारत व युरोपमधील व्यापार , उद्योग व अन्य क्षेत्रातील माहिती सत्वर मिळते. युरोपियन युनियनच्या अधिका-यांशी व प्रतिनिधींशी प्रतिष्ठानने वेळोवेळी निरनिराळया प्रकल्पाबाबत उपयुक्त चर्चा केली आहे.

७ अनुबोधपट : श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावर अनुबोधपट काढण्याचे काम श्री.विनय नेवाळकर यांच्यावर सोपविण्यात आले असुन मा.चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट काढण्याचे काम डॉ.जब्बार पटेल यांच्यावर सोपविले आहे. वरील अनुबोधपटाबाबत श्री.नेवाळकर व डॉ.पटेल यांच्याबरोबर वेळोवेळी चर्चा झाली असुन त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

८ खुली निबंध स्पर्धा : प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांचा भाग म्हणून दरवर्षी खुल्या निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येतात. सदर स्पर्धेसाठी अनुक्रमे प्रथम पारितोषिक रु.५०००/- द्वितीय पारितोषिक रु.३०००/- व तृतीय पारितोषिक रु.२०००/- चे आहे. सन १९९९ साली खालील दोन विषयांवर खुली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

१ भारताची संरक्षण सिध्दता व अण्वस्त्रधारण
२ संमिश्र सरकारे व भारतीय लोकशाही

परीक्षक म्हणून कर्नल के.सी.गुप्ते, व डॉ.सुरेश माने यांनी काम पाहिले. प्रथम पारितोषिक विभागुन डॉ.प्रमोद वियाणी,नाशिक व श्री.देवेंद्र सुर्वे,ठाणे यांना देण्यात आले. द्वितीय पारितोषिक श्री.हेमराज बागुल,नाशिक व तृतीय पारितोषिक श्री.दिपक गावडे,पुणे यांना देण्यात आले.

९ **यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिके पारितोषिक योजना** : या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील निरनिराळया विद्यापीठांकडून त्यांच्याकडे महाविद्यालयांची प्राप्त होत असलेली नियतकालिके मागविण्यात येतात. नियतकालिकांची छाननी परीक्षकाकडून करुन घेण्यात येते. त्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात येऊन प्रथम पारितोषिक रु.१५,०००/-, द्वितीय पारितोषिक रु.१०,०००/-, तृतीय पारितोषिक रु.५०००/- असे देण्यात येतात.

यावर्षी खालील विद्यापीठांना पारितोषिके प्राप्त झालेली आहे. त्यांचे परीक्षण डॉ.सरोजिनी वैद्य, श्रीमती ज्योती म्हापसेकर व श्री.वि.चिं-फडके यांनी केले.

**प्रथम पारितोषिक** वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ,सोलापूर '**विटनेस**' शिवाजी विद्यापीठ.

**द्वितीय पारितोषिक** : तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट,वारणा नगर. '**होरायझन**' शिवाजी विद्यापीठ.

**तृतीय पारितोषिक** : पश्चिम खानदेश भगिनी सेवा मंडळाचे कला,वाणिज्य महिला महाविद्यालय '**स्वयंसिध्दा**' एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ

**उत्तेजनार्थ** प्रत्येकी रु.३०००/-

१ कला वाणिज्य महाविद्यालय,येवले. पुणे विद्यापीठ

२ एल.ए.डी. आणि श्रीमती आर.पी.महिला महाविद्यालय,नागपूर,

३ सिडनम कॉलेज,मुंबई यांना देण्यात आले.

१० **यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक योजना** महाविद्यालयातील १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सन १९९९ मध्ये 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक' ही योजना प्रतिष्ठानने लेख, कथा व कविता या तीन साहित्य प्रकारांकरीता आयोजित केली होती- विजेत्यांना प्रथम पारितोषिक रु.३०००/, द्वितीय पारितोषिक रु.२०००/- तृतीय पारितोषिक रु.१०००/- व प्रमाणपत्र अशा स्वरुपात मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी प्रदान करण्यात आले. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री.अरुण शेवते, श्री. अ.ना.पेडणेकर, व श्री.महेश केळसकर यांनी काम पाहिले. या योजने अंतर्गत खालील महाविद्यालयीन साहित्यकांना पारितोषिके देण्यात आली.

**कथा प्रथम पारितोषिक विभागून**

श्री.दत्तात्रय खामकर कृषी महाविद्यालय,धुळे कथेचे नांव : 'कळांगन' व

श्री.नरेश गवळी ,के.जे.एस.महाविद्यालय,कोपरगांव जि-अहमदगनर कथेचे नांव : मायलेकी

**द्वितीय पारितोषिक विभागून**

श्री.भारत कांबळे,श्री कुमारस्वामी महाविद्याल,औसा, जि-लातूर कथेचे नांव 'भूक' व

कु.शकुंतला विठोबा वागदरी, वसंतराव नाईक कॉलेज,मुरुड -जंजिरा, कथेचे नांव : 'रामा

**तृतीय पारितोषिक विभागून**

श्री.भाऊराव तनपुरे, श्री बाबासाहेब धाबेकर कला वाणिज्य महाविद्यालय,रिसोड, जि-वासिम कथेचे नांव 'शिवार' व श्री.विजय कांबळे, जयसिंगपूर महाविद्यालय,जयसिंगपूर, कथेचे नांव : भास'

**लेख प्रथम पारितोषिक**

कु.उर्मिला नायडू

श्री.रामदेवबाबा कमला नेहरु इंजिनियरींग कॉलेज,नागपूर,

लेखाचे नांव - 'कॉम्प्युटर ॲप्लिकेशन इन बायोमेडिकल फिल्ड'

**द्वितीय पारितोषिक**

कु.योगिता पाटील, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक महाविद्यालय,शहादा जि-नंदूरबार

लेखाचे नांव : 'भारतीय स्त्रियांची मध्य:स्थिती'

**तृतीय पारितोषिक** /- कु.नयना भांबरे, जयहिंद महाविद्यालय,धुळे

लेखाचे नांव-'स्त्री आरक्षणाची आवश्यकता आहे का' ?

**उत्तेजनार्थ** श्री.योगेश पाटील, पूज्य साने गुरुजी महाविद्यालय, शहादा, जि-नंदुरबार

**कविता प्रथम पारितोषिक**

श्री.अरुण रसाळ मिलिंद कला महाविद्यालय,औरंगाबाद,

कवितेचे नांव- 'महया मायची कईता'

**द्वितीय पारितोषिक**

कु.स्मिता पाटील, वालचंद कॉलेज,सोलापूर

कवितेचे नांव- 'प्रेम म्हणजे'...

**तृतीय पारितोषिक**

श्री.ललीत आधाने, विवेकानंद महाविद्यालय, समर्थ नगर, औरंगाबाद.

कवितेचे नांव- 'गळफास'

**उत्तेजनार्थ** सीमा देशमुख के.टी.एच.एम.कॉलेज,नाशिक,

कवितेचे नांव-'नाद मग्न'

श्री.नागोजी गावडे, शिवराज महाविद्यालय,गडहिंग्लज,

कवितेचे नांव-'पडली'

**११ यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक व राष्ट्रीय पुरस्कार** : प्रतिष्ठानच्या उद्दिष्ठामधील एक भाग म्हणून खालीलक्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ती वा संस्थेला चक्रीयपध्दतीने दरवर्षी रु.५१०००/ चे पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१ यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना पारितोषिक

२ यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक

३ यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास पारितोषिक

४ यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती पारितोषिक

**यावर्षी यशवंतराव चव्हाण** सामाजिक एकात्मता पारितोषिक दिवंगत दादासाहेब रुपवते यांना देण्याचे **जाहीर झाले**.

मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्यं सामाजिक-आर्थिक विकास याक्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व मानपत्र' देण्यात येते. पुरस्काराची रक्कम रुपये १ लाख असून सुयोग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्यन्यायधीश वाय.व्ही.चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीचे सदस्य डॉ. होमी सेठना, मा.डॉ.मनमोहनसिंग, मा.डॉ.जी.व्ही.के.राव, व मा.श्री.शिशिर बोस हे आहेत. निवड समितीच्या शिफारशीनुसार यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार माजी अध्यक्ष फॅमिली प्लानिंग असोशिएशन ऑफ इंडिया, श्रीमती आवाबाई वी.वाडिया यांना देण्याचे निश्चित करण्यात येऊन मा.चव्हाणसाहेबांच्या जयंतीदिनी म्हणजे १२ मार्च २००० रोजी नियोजन मंडळाचे माजी सदस्य मा.डॉ- एम.एस.स्वामीनाथन यांच्या हस्ते त्यांना रु.१ लाख व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

१२ **<u>मा.चव्हाणसाहेबांचा पुण्यतिथीदिन व जयंतीदिन साजरा</u>** : मा.चव्हाणसाहेबांची पुण्यतिथी व जयंतीदिन प्रतिष्ठानच्या सभागृहात साजरे करण्यात आले. यावर्षीचे यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दिवंगत दादासाहेब रुपवते यांना देण्याचे निश्चित करण्यात येऊन त्यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्रीमती सुशीलाबाई रुपवते यांना दिनांक २५ नोव्हेंबर १९९९ रोजी मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी श्रेष्ठ कवि, मा.नारायणराव सुर्वे यांच्या हस्ते रोख रक्कम रु.५१०००/- व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

१३ **<u>अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम</u>** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती,सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर प्रबोधनाचे कार्यक्रम राबविले जातात. त्यामध्ये ७ ते १० लाखापर्यन्त लोकांशी थेट दरवर्षी संबंध येतो. तसेच 'सत्यशोध प्रज्ञा परीक्षा'मार्फत महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची तसेच प्राध्यापकांची शिबीरे घेतली जातात व त्याची परीक्षा घेतली जाते. सदर कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई, समितीस दरवर्षी आर्थिक सहाय्य करते.

१४ **<u>यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व महाराष्ट्र राज्य शासन मिळून युरोपियन युनियनच्या सहकार्याने सुरु असलेला पंचायत राज सदस्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रकल्प</u>** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई, युरोपियन युनियन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर पंचायत राज प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला जात आहे. प्रतिष्ठानमध्ये प्रशिक्षण विभाग उघडला असून तो स्वतंत्रपणे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री.ज्ञानेश्वर खैरे यांच्या नियंत्रणाखाली चालू आहे. प्रशिक्षणाचा एकूण अंदाजे खर्च रुपये २ कोटीपर्यन्त असून त्यापैकी ८८ लाख रुपये प्रतिष्ठानला युरोपियन युनियनकडून आर्थिक मदत मंजूर झाली. प्रकल्पासाठी लागणारी उर्वरित रक्कम महाराष्ट्र शासनाचे खर्च करावयाची आहे. प्रत्यक्षांत युरोपियन युनियनने आतापर्यन्त ४८ लाख रुपये दिलेले आहेत.

ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्रातील १३ स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत होता. त्यामध्ये शासनाने वाढ करुन स्वयंसेवी संस्थांची संख्या २५ केली आहे, याशिवाय ११ पंचायत राज प्रशिक्षण केंद्रांना या कामात समाविष्ट करुन घेतलं आहे. त्यापोटी स्वयंसेवी संस्थेला एका ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणाला रु.१००/- प्रमाणे खर्च देण्यात येतो. त्यापैकी महाराष्ट्र शासन रु.६४/- खर्च देतं व प्रतिष्ठान रु.३६/- देते. आतापर्यन्त १ लाख ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण दिलं आहे. जवळजवळ ६० हजार सदस्यांचे प्रशिक्षण पूर्ण व्हावयाचे आहे. प्रशिक्षणासाठी येणा-या सदस्यांना प्रतिष्ठानतर्फे एक माहिती पुस्तिका द्यावी, असे ठरले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेतील तज्ञ श्री.खुटवड व श्री.अवधानी यांनी एक ४८ पानांची 'नवं पंचायत राज्य' नावाची पुस्तिका तयार केली असून ती महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींना पुणे केंद्रामार्फत मोफत पाठविण्याचे काम चालू आहे.

१५ **प्रथम मुंबई शिक्षण उपक्रम** प्रथम या संस्थेच्या उपक्रमाला प्रतिष्ठान सहकार्य उपलब्ध करुन देतं. त्याम अनुसरुन प्रथमच्या कार्यालयासाठी केंद्र इमारतीतील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे व त्या जागेत प्रथमने आपले कार्यालय उभारले आहे. प्रथम चे प्रमुख डॉ.माधव चव्हाण व श्रीमती फरीदा लांबे या प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री.शरद काळे यांच्याशी सतत संपर्क साधत असून त्यांचं मार्गदर्शन घेत असतात. मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या चालविणे संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरीता शिक्षक-शिक्षिका तयार करणं इत्यादी महत्वपूर्ण काम 'प्रथम' मार्फत मोठ्याप्रमाणावर केलं जातं.

**यशवंतराव चव्हाण स्कॉलरशीप :**

१ आदर्श गांव संशोधन प्रकल्प :

टाटा इन्स्टिट्यू ऑफ सोशल सायन्सचे श्री.सी.व्ही.मधुकर यांनी आदर्श गांव संशोधन प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे, असे कळविलं आहे. देशातील स्वयंसेवी संस्था/व्यक्तींनी वयाच ठिकाणी आदर्श गाव म्हणून विकास साधला आहे. हा प्रयोग बहुतांशी यशस्वी झालेला आहे. या आदर्श गांव संकल्पनेबाबतचे संशोधन करुन एकत्रित ग्रामीणधोरण आखता येईल का ? याबाबत संशोधन पूर्ण करुन त्याचा प्रकल्प अहवाल लवकरात लवकर अपेक्षित आहे.

२ **महर्षी विठ्ठ रामजी शिंदे : जीवन व कार्य**

श्री.गो-मा.पवार,सोलापूर यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य या विषयावर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रतिष्ठानने रुपये ३५०००/- ची शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे. सदर प्रकल्प चालू असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

१६)   **महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम संशोधन प्रकल्प** :

सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात मोठयाप्रमाणात औद्योगिक विकास झाला आहे. औद्योगिकरणाबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही फार मोठे फेरबदल दिसून आलेले आहेत. औद्योगिकरणाचे समाजावर, भाषेवर, संस्कृतीवर, लोकांच्या राहणीमानावर काय परिणाम झाले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी श्री.प्रकाश देशमुख, पत्रकार यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. श्री.देशमुख हे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहेत.  शासनाच्या उद्योग विभागाने सदर प्रकल्प उपयुक्त असल्याचे कळविले आहे. त्याबाबतीत कार्यवाही चालू आहे.

१७)  **प्रतिष्ठानमार्फत देणग्या /अनुदान** :

अ)  श्रीमती वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्ट कराड या संस्थेला ग्रंथालयामध्ये संदर्भ ग्रंथ घेण्याकरीता प्रतिष्ठानने रु.२,५०,०००/ चे अनुदान मंजूर केले असून चालू वर्षात रुपये १,४३,०००/- अदा केलेले आहेत-

ब)   पुणे विद्यापीठातील ग्रंथपाल श्री.चंद्रकांत प.फरांदे यांना युरोपमधील मराठी हस्तलिखित नालीका  प्रकल्पासाठी रु.१०,०००/- चे अनुदान मंजूर करण्यात आले.

क)   सार्वजनिक उत्सव समिती,नवी दिल्ली या संस्थेला यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहासाठी (२० व २१ नोव्हेंबर १९९९)  रु.२५०००/- चे अनुदान देण्यात आले. या समारोहात 'कुसुमाग्रज आदरांजली' व साने गुरुजी जन्मशताब्दी स्मरण असे दोन कार्यक्रम लोकसभा अध्यक्षांच्या दालनात विठ्ठलभाई पटेल हाऊस,नवी दिल्ली येथे पार पडले.

ड)   डॉ.श्रीराम रामजी घोले व डॉ.रघुनाथ विठ्ठल खेडकर यांच्या चरित्रासंबंधीच्या श्रीमती अरुणा ढेरे यांच्या प्रकल्पासाठी रु.६३०००/- चे अनुदान मंजूर करण्यात आले. त्यापैकी रु.३१०००/- अनुदान यावर्षी अदा करण्यात आले.

इ)   युवक बिरादरी,मुंबई शाखा यांनी आयोजित केलेल्या 'वसुंधरा बचाव अभियान' या देशपातळीवरील व महाराष्ट्रातील काही जिल्हयांतील मोहिमेसाठी  (२४ डिसेंबर ९९ ते ३० जाने २०००) रु.१,७५०००/- चे अनुदान देण्यात आले. लोकसंख्या नियंत्रण व पर्यावरण संवर्धन यावर महाराष्ट्रातील १२ जिल्हयात प्रबोधन करण्यात आले.

ई)  मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय : मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय यांना प्रतिष्ठानकडून रु.२,५०,०००/- चे  अर्थसाहाय्य देण्यात आले.

उ)  साताराचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार : सदरचे पुस्तक  ॲड डी.एम.पाटील यांनी लिहिले ऊआहे. त्यासाठी त्यांना रु.२५,०००/- चे अनुदान देण्यात आले.

ऊ)  कारगिल संघर्षात शहिद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी रु.२,५०,०००/- देणगी मा.पंतप्रधान निधीसाठी देण्यात आली.

१८ **इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन महाराष्ट्र शाखा :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन, महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण मेमोरियल लेक्चर' आयोजित करण्यात येते. यासाठी प्रतिष्ठानने रु.१०,०००/- सदर संस्थेस देणगी म्हणून दिलेले आहेत. त्यानुसार दि-२९-११.९९ रोजी प्रतिष्ठानमध्ये मा.डॉ.आर.चिदंबरम्,अध्यक्ष अॅटोमिक एनर्जी कमिशन यांचे 'न्युक्लिअर पॉलिसी व नॅशनल डेव्हलपमेंट' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१९ **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठात मा.चव्हाणसाहेबांचा पूर्णाकृति पुतळा :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या विनंतीनुसार विद्यापीठाच्या परिसरात मा.चव्हाणसाहेबांचा पूर्णाकृति पुतळाउभारण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे एक पुतळा भेट म्हणून देण्याचे ठरविण्यात आले होते. सदर पुतळा शिल्पकार,श्री.वाय.जी.सावंत,मुंबई यांच्याकडून तयार करुन घेण्यात आला- शिल्पकार सावंत यांनी मा.चव्हाणसाहेबांच्या पुतळयाचे मातीचे शिल्प मा.श्री.बाबुराव सडवेलकर, माजी संचालक, जे.जे.स्कूल ऑफ आर्टस,मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करुन दिले. सदर पुतळयाचे अनावरण नाशिक येथे मुक्तविद्यापीठाच्या आवारांत दि.१२ मार्च २००० रोजी मा.डॉ.पी.सी.अलेक्झांडर, राज्यपाल यांचे हस्ते व प्रतिष्ठानचे अध्यक्ष, मा.शरदराव पवार, मा.ना.विलासराव देशमुख,मुख्यमंत्री, मा.श्री.छगनराव भुजबळ,उपमुख्यमंत्री तसेच ना.श्री.दिलीप वळसे-पाटील,उच्च व तंत्रशिक्षणमंत्री, ना.श्री.सुरुपसिंग नाईक,वने आणि पर्यावरणमंत्री, ना.श्री अनीस अहमद,उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री, ना.ए.टी.पवार, पशुसंवर्धन व दुग्धविकासमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

२० **यशवंतराव चव्हाण यांचे कराड येथील निवासस्थान ' विरंगुळा ' बंगला :**

मा.चव्हाणसाहेबांचे कराड येथील विरंगुळा या बंगल्यामध्ये अनेकवर्षे वास्तव्य, सान्निध्य व संबंध लक्षात घेऊन सदर बंगला प्रतिष्ठानने खरेदी केलेला आहे. सदर वास्तुची देखभाल (किरकोळ दुरुस्ती, वीज बील, नगरपालिका टॅक्स, बागबगिच्याची देखभाल, वॉचमन व शिपाई) व्यवस्थेची जबाबदारी दि कराड जनता सहकारी बँक लि.कराड यांनी घेतली असुन कराड केंद्राचे कामकाज सदर वास्तूमध्ये चालू आहे.

२१ **महाराष्ट्र शासनाकडून अनुदान** अथशर्यतीच्या उत्पनातुन महाराष्ट्र शासनाच्या गृह खात्याकडुन अश्वशर्यतीच्या उत्पन्नातून रु.४ लाख प्रतिष्ठानच्या कार्यक्रम/उपक्रमासाठी अनुदान म्हणून दरवर्षी देण्यात आले आहेत. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे आभारी आहोत.

२१ <u>वार्तापत्र</u> : यशवंतराव चव्हाण सेंटर,मुंबई येथे कार्यरत असलेल्या नवभारत युवा आंदोलन, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, लिगल एड फोरम, रंगस्वर, कृषी व सहकार व्यासपीठ, पंचायत राज प्रशिक्षण, इंटरनेट प्लाझा व माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी इत्यादी विविध विभागांच्या कार्याविषयींचा अहवाल व माहिती तीन महिन्यातून एकदा प्रतिष्ठानच्या सर्व सभासदांना कळावी या हेतूने हे त्रैमासिक वार्तापत्र प्रसिध्द होत असते. यावर्षी जून, एप्रिल, डिसेंबर ९९ या महिन्यात प्रसिध्द केलेले वार्तापत्राचे तीनही अंक प्रतिष्ठानच्या सर्व सभासदांना पाठविण्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी-औद्योगिक परिवर्तनासाठी झटणारे ज्येष्ठ मुत्सद्दी व धुरंधर विचारवंत नेते मा.यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचारही वार्तापत्रामधून सर्वापर्यन्त पोचविण्याचा प्रयत्न केला जातो. वार्तापत्र रजिस्टर करण्याच्या प्रयत्नांना यावर्षी यश मिळाले आहे. यावर्षीच्या वार्तापत्र अंकांना मा.मोहन धारिया,कार्याध्यक्ष, मा.शरद काळे,सरचिटणीस, मा-बापुसाहेब खैरे, डॉ.रविंद्र बापट यांचे सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य लाभले. मानद संपादक म्हणुन श्रीमती रेखा नार्वेकर या वार्तापत्राची जबाबदारी सांभाळतात.

२२ <u>ग्रंथोत्सव</u> : मा-पंडित जवाहरलाल नेहरु आणि मा.यशवंतराव चव्हाण या दोघांचे ग्रंथप्रेम लक्षांत घेऊन, तसेच १४ नोव्हेंबर हा पंडितजींचा जन्मदिवस व २५ नोव्हेंबर यशवंतरावजींची पुण्यतिथी या संस्मरणीय घटना म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर १९९९ या दरम्यान चव्हाण सेंटरमध्ये ग्रंथोत्सव आयोजित केला होता. ग्रंथोत्सवासाठी केंद्र इमारतीमध्ये जवळजवळ ६६ स्टॉल्स उभारण्यात आले होते. ग्रंथोत्सवाचे उद्‌घाटन मा- ज्योर्तिभास्कर जयंतराव साळगांवकर यांनी केले. ग्रंथोत्सवास रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ग्रंथोत्सवास वर्तमानपत्रातून चांगल्याप्रकारे प्रसिध्दी मिळाली- ग्रंथोत्सवाचा समारोप ज्येष्ठ कवि मा.श्री.ना.धों.महानोर यांनी केला. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ.रवि बापट होते. याकाळात काही सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आले.

२४ <u>ज्ञानयज्ञ (ग्रंथाली) प्रकल्प</u> :

दिनांक ५.११.१९९८ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीमध्ये श्री.दिनकर गांगल,सचिव,ग्रंथाली यांनी पत्र लिहून अशी माहिती दिली की, १००० दिवसांमध्ये १००० पुस्तके प्रकाशित करुन ज्ञानयज्ञ प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रातील किमान १००० घरामध्ये पोहचती करण्याचा संकल्प आहे. यावर विचार होऊन या प्रकल्पासाठी प्रतिष्ठानने रुपये तीन लाख मदत देण्याचे मान्य करुन आतापर्यन्त १.५० लाखाची मदत अदा केली आहे.

२५ **साप्ताहिक सकाळमधील लेखमाला** : महाराष्ट्रातील समाजकार्य करणा-या स्वयंसेवी संस्थावर लेखमाला लिहून रविवारच्या साप्ताहिक सकाळ वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचा प्रकल्प श्री.आरती जोगळेकर,पुणे यांनी प्रतिष्ठानला सादर केला. यावर प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने विचार करुन प्रकल्पाचे स्वागत करुन महाराष्ट्रभर फिरावे लागत असल्याने प्रवास खर्चापोटी रुपये १२०००/- अनुदान मंजूर केलेले आहे. या लेखमालेत आतापर्यन्त चार लेख प्रसिध्द झाले आहेत.

२६ **मा.चव्हाणसाहेबांच्या संसदेतील भाषणे खंड ३-४** : मा.श्री.राम प्रधान,विश्वस्त यांनी संपादित केलेली मा.चव्हाणसाहेबांची संसदेतील भाषणे खंड ३ व ४ मेसर्स. अमेय प्रकाशन,पुणे यांनी छापून तयार ठेवलेली आहेत. सदर ग्रंथांचे प्रकाशन दिल्ली येथे करण्याचे योजिले आहे. या मालिकेचे १ ते ४ खंड एकत्रित करुन सदर ग्रंथांच्या प्रती संसद व सर्व राज्यांतील विधानमंडळांच्या ग्रंथालयांना व मा.चव्हाणसाहेबांच्या समकालीन मान्यवरांना भेट म्हणून देण्याचे ठरले आहे.

२७ **माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी** : २१ व्या शतकास सामोरे जाण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान हे अतिशय वेगवान व प्रभावी तंत्रज्ञान साधन उपलब्ध आहे, हे आता सर्वमान्य झालेले आहे. संगणकाचा वापर सर्वच क्षेत्रात सुरु झालेला आहे. संगणकाच्या प्राथमिक वापरापासून ते इंटरनेटपर्यन्तचे शिक्षण आपल्या गरजेप्रमाणे घेणे हे आधुनिक भारतात आवश्यक झाले आहे. नवीन तंत्रज्ञानाचा पूर्ण लाभ मिळविण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञ तयार होणेही आवश्यक आहे. या दृष्टीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.शरदराव पवार यांनी विश्वस्तांसमोर प्रतिष्ठानने 'माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी' स्थापन करुन नवीन युवक-युवतींना संगणक प्रशिक्षणाचा लाभ देता यावा म्हणून सीडॅक,पुणे या नामवंत संस्थेचे कोर्सेस प्रतिष्ठानने सुरु करावेत, असा विचार मांडला. इतकेच नव्हेतर, महाराष्ट्रातील सर्व माध्यमिक शाळा संगणकाद्वारे प्रतिष्ठानला जोडून 'एज्युकेशन टू होम' ही योजना सुरु करण्याबद्दलही विचार मांडला विश्वस्तांनी या प्रकल्पास तत्वत: संमती दिली. त्यास अनुसरुन प्रतिष्ठानने 'माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी' स्थापन केली आहे. प्रतिष्ठानने सी-डॅक,पुणे या संस्थेबरोबर ४ जानेवारी १९९९ रोजी करार करुन पहिला डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (डीआयटी) हा कोर्स १० मे १९९९ रोजी सुरु केला आहे. तसेच डिप्लोमा इन ॲडव्हान्सड कॉम्प्युटींग (डॅक) हा देशपातळीवरील कोर्स दि.१६.८.१९९९ पासुन सुरु केला आहे.

वरील सर्व कोर्सेससाठी आधुनिकपध्दतीची यंत्रसामुग्री प्रतिष्ठानने खरेदी केली आहे. संगणकवर्ग व संगणक लॅबोरेटरी सर्व सोयींनी सुसज्ज करण्यात आली आहे. यासाठी लागणारा प्रशिक्षित सेवकवर्ग नेमण्यात आलेला आहे. ही व्यवस्था प्रतिष्ठानच्या केंद्र इमारतीतील चौथ्या मजल्यावर करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पामुळे युवक-युवतींचा राबता वर्षभर प्रतिष्ठानमध्ये राहिलच, पण त्यायोगे नवभारतच्या उभारणीसाठी कुशल तंत्रज्ञही उपलब्ध होतील. शासकीय कर्मचारी-औद्योगिक संस्था तसेच इतर कार्यालये यांच्याशी प्रतिष्ठानचा जवळून संबंध येईल. 'एज्युकेशन टू होम' हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर सर्व महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील शाळांत व महाविद्यालयात शिक्षण घेणारी सर्व मुलेही या उपक्रमांचा लाभ घेऊ शकतील. त्यामुळे त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी प्रतिष्ठानचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास वाटतो. प्रतिष्ठानच्या प्रबोधिनीमार्फत सार्वजनिक बांधकाम खात्यातील सेवकवर्ग व अधिकारी यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले. त्याचप्रमाणे साखर महासंघातील सेवकांना सदर प्रशिक्षण देण्यात आले. आतापर्यन्त डीआयटी कोर्सेसचे तीन महिन्याचे पांच वर्ग (मे १९९९ ते मार्च २०००) पर्यन्त घेण्यात आले. सुमारे १००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे सी-डॅक,पुणे यांनी प्रमाणपत्र दिली. विधानभवनातील १७६ सेवकांना सदर प्रशिक्षण दिले तसेच ठाकूरद्वार,मुंबई येथे एक व्हर्च्युअल सेंटर प्रतिष्ठानच्या अधिपत्याखाली चालविण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी डिस्टंन्ट एज्युकेशन सुविधेचा लाभ घेतला आहे. मुंबई येथील नौदलातील अधिका-यांनी यावर्गासाठी रुची दाखविली आहे.

डॅक-चा प्रशिक्षणवर्ग सहा महिन्याचा पूर्ण वेळ असून तो १२ ऑगस्ट ९९ मध्ये सुरु झाला आहे. सदर वर्गामधून १०६ विद्यार्थी पास झाले. रिझर्ल्ट १०० % लागला. सदर प्रबोधिनीने आता ॲडव्हान्स एडीआयटी कोर्स पुढीलवर्षी सुरु करण्याचे ठरविले आहे. तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर स्थापन करण्याचे ठरविले आहे.

डॅक कोर्सच्या वर्गामध्ये श्रीमती मोहनिशा परेरिया ही विद्यार्थी सर्वोत्कृष्ट ठरली. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी यांनी प्रशिक्षीत केलेल्या विद्यार्थ्यांची नामवंत संस्थांनी निवड करुन सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या सेवेत सामावून घेतले. त्या संस्थांची नांवे : सिल्व्हर लाईन, स्पिज, झेनेसिल सॉफ्टवेअर, इनटेग्रा,बंगलोर, सेनेटल इंडिया लि., ग्लोबल टेलेसिस्टिम्स, नोबेल इंडिया, ओरिजन सॉफ्टवेअर , हायलॅन्ड कम्युनिकेशन, सावा सॉफ्टवेअर, टाटा टेक्नॉलॉजी,पुणे. अदिडेटा टेक, बी.पी.एल.इंडिया, इन्फॉसिस,बेंगलोर, कॉम्स इंडिया, न्युक्लिअस सॉफ्टवेअर. काही कंपन्यांनी प्रतिष्ठानमध्ये येऊन विद्यार्थ्यांची निवड केली. तर काही विद्यार्थी मुलाखतीसाठी बंगलोरला पाठविले होते. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीचे संचालक,श्री.सुशील गुप्तन, कोर्स कोआर्डिनेटर श्री.मयूर परांजपे व चिफ मार्केटींग ऑफिसर म्हणून श्री.विक्रम वासुदेव हे काम पाहतात. डॅक चा दुसरा वर्ग दि. १२ फेब्रुवारी २००० रोजी सुरु झाला असून त्यामध्ये ७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

२८ **<u>भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा : संशोधन प्रकल्प</u>** :-

भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा यांनी महाराष्ट्रातील भटक्या जमातींचा पथदर्शक प्रकल्प जून १९९९ पासून सुरु केला आहे. पहिल्या टप्प्यात १८ जिल्हयांचे सर्वेक्षण पूर्ण केले असून उर्वरित जिल्हयांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी प्रतिष्ठानने १,५०,०००/- अनुदान मंजूर केलेले आहे. त्यापोटी यावर्षी भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेस प्रतिष्ठानकडून रु.४०,०००/- अर्थसहाय देण्यात आलेले आहे. संस्थेकडून वेळोवेळी अहवाल प्राप्त होत आहेत.

२१ **नवभारत युवा आंदोलन** :

१) यशवंतराव चव्हाण स्मृती गुणगौरव चषक : सलगपणे यंदाच्या सहाव्यावर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर वक्तृत्व व निबंध स्पर्धा वैशिष्टपूर्णरितीने आयोजित करण्यात आली. स्पर्धेपूर्वी तज्ञांची दिशादर्शक कार्यशाळा घेण्यात आली. यातील खुल्या चर्चेनंतर प्रत्यक्ष स्पर्धा पार पडली. याप्रकारे ही स्पर्धा मुंबई. पुणे. (फलटण शिवाजी विद्यापीठ) येथे घेण्यात आली. सहसंयोजक म्हणून यशवंतराव चव्हाण पुणे विभागीय केंद्र व फलटण युथ फाउंडेशन.फलटण या संस्थांचे सहकार्य लाभले- यशस्वी स्पर्धकांना सन्मानचिन्हे प्रशस्तीपत्र व रोख रक्कमेच्या स्वरुपात पारितोषिके देण्यात आले.

२) समाज कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग : मुंबईतील सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक कार्याची आवड असणा-या स्त्री-पुरुषांकरीता सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षणवर्ग (सहा महिने) आयोजित करण्यात आले. यामध्ये २२ प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला. या प्रशिक्षणवर्गात विविध क्षेत्रातील तज्ञांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणार्थींकरीता प्रकल्प भेट सर्वहारा जनआंदोलन रोहा येथे आदिवासी बांधवांकरीता काम करणा-या संघटनेसह आयोजित करण्यात आली होती. व त्याचबरोबर युसुफ मेहरअली सेंटर,तारा येथेसुध्दा प्रकल्प भेट आयोजित करण्यात आली होती.

३) एड्स. प्रतिबंधक प्रशिक्षण नेतृत्व कार्यशाळा : राष्ट्रीय एडस नियंत्रण संघटनेच्या मार्गदर्शक सूत्रानुसार यावर्षी मुंबई येथे दोन शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या दोन्ही शिबिरात ५५ प्रशिक्षणार्थ्यांनी भाग घेतला होता.

४) स्वातंत्र्यदिन रात्र फेरी : दि.१४ ऑगस्ट १९९९ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्ताने संबंधित कार्यकर्त्यांची रात्रफेरी काढण्यात आली. फेरीमध्ये राष्ट्रगीत, संविधान प्रतिज्ञा, कार्यकर्त्यांची भाषणे व राष्ट्रीय स्मारकांना भेटी देण्यात आल्या. या फेरीत ४० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

५) चर्चासत्र बैठका : रेशनिंग प्रश्नांवर जिल्हावार बैठका आंदोलनाच्यावतीने मुंबई, पुणे, सांगली, नाशिक, नागपूर येथे आयोजित करण्यात आल्या. रेशनिंग भाववाढसंदर्भात मा.अन्नपुरवठामंत्री व राज्यमंत्री यांना निवेदने सादर करुन चर्चा करण्यात आली.

६) 'वेध जाणिवांचा' : नवभारत युवा आंदोलन व समर्थन या संस्थांच्या विद्यमाने संगमनेर व बीड येथे वेध जाणिवांचा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात मानवाचा इतिहास, भारतीय राज्यघटना, जातिव्यवस्था, सामाजिक कार्य व कार्यकर्ते सांस्कृतिक चळवळ व विद्यार्थी, या प्रमुख विषयांवर डॉ.प्रमोद बियाणी, डॉ.रावसाहेब कसबे, प्रा.मिलिंद धरम, ॲड मंधराज रुपवते, भास्करराव कोल्हे, ॲड प्रेमानंद रुपवते इत्यादींनी युवा कार्यकर्त्यांसमोर भाषणे केली. या शिबिरात ६५ कार्यकर्ते उपस्थित होते. सहयोगी संस्था, लोकपंचायत व मानवीहक्क अभियान यांनी स्थानिक संयोजनाची जबाबदारी पार पाडली.

७) वेध भारतीय संविधानाचा : भारतीय संविधाच्या अर्धशतक पूर्तीनिमित्ताने नवभारत युवा आंदोलन, व समर्थन यांच्या वतीने 'वेध भारतीय संविधानाचा' ही दोन दिवसीय कार्यशाळा (विधायक संसद) उसगांव, डोंगरी,ता.वसई जि.ठाणे येथे आयोजित करण्यात आले होती. या कार्यशाळेत भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची प्रक्रिया मूल्य, घटनात्मक मुलभुत अधिकार, भारतीय राज्यघटना व अर्थव्यवस्था, घटनेपुढील आव्हाने या विषयांवर डॉ.सत्यरंजन साठे प्रा.नलिनी पंडीत, ॲड संघराज रुपवते, विवेक पंडीत, प्रेमानंद रुपवते यांनी भाषणे केली. हे वर्ष 'संविधान गौरव वर्ष ' म्हणून साजरा करण्याचे ठरविले व पुढील कार्यक्रमाची आखणी करुन कृति कार्यक्रम सादर करण्यात आला. या दोन्ही दिवशी कार्यशाळेत महाराष्ट्रातील ६० कार्यकर्ते उपस्थित होते. पुढील बैठका चेतना कॉलेज,वांद्रा, मुंबई व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई येथे घेण्यात आल्या.

८) इतर कार्यक्रम :

- दि.५ डिसेंबर १९९९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ४४ व्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त स्मृति अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत आंदोलनाच्यावतीने प्रेमानंद रुपवते दत्ता वाळसराफ, मिलिंद कांबळे उपस्थित होते.
- जागतिक आरोग्यदिनानिमित्त 'वनमाळी हॉल',दादर येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला. वस्तीवस्तीत, गावागावात, आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, हा परिसंवादाचा मुख्य विषय होता. या परिसंवादात दत्ता वाळसराफ यांनी आपले विचार मांडले. नवभारत युवा आंदोलनाचे १० कार्यकर्ते उपस्थित होते.
- नवभारत युवा आंदोलन : 'दारिद्रयरेषा योजना' हक्क संरक्षण समितीची घटक संस्था असून या समितीच्यावतीने एक दिवसीय चर्चासत्र मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात आंदोलनाच्यावतीने दत्ता वाळसराफ, मिलिंद कांबळे, रमेश कदम, जयवंत घाडी यांनी सहभाग घेतला.
- अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे २९ वे अधिवेशन दोन दिवस मुंबई येथे घेण्यात आले. अधिवेशनाच्या संयोजनाची जबाबदारी नवभारत युवा आंदोलनाने यशस्वीरित्या पार पाडली.
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दिवंगत दादासाहेब रुपवते यांच्या पुतळयाचा अनावरण समारंभ भंडारदरा, अकोला, जि.अहमदनगर येथे पार पडला. प्रतिष्ठानच्यावतीने दत्ता वाळसराफ, विद्याधर खंडे, मिलिंद कांबळे इत्यादी उपस्थित होते.

९ पर्यावरण प्रशिक्षण शिबिर : 'फन्साड' अभयारण्य मुरुड येथे पर्यावरण शिबिर दोन दिवसाचे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात पक्षी निरीक्षण, प्राणी निरीक्षण, चित्रफिती, निसर्ग फेरफटका, चर्चासत्रे इत्यादी विषयावर डॉ. दिपक आपटे, संदीप परांजपे, कैलास दारोळे, अंजन रुपवते यांनी मार्गदर्शन केले. यात ३० स्त्री-पुरुष यांनी सहभाग घेतला. नवभारत युवा आंदोलन हा विभाग ॲड प्रेमानंद रुपवते व श्री.दत्ता वाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतो.

३० **महाराष्ट्र महिला व्यासपीठ** : प्रतिष्ठानने महिलावर्गामध्ये त्याच्या हक्काची जाणीव करण्यासाठी व प्रबोधनाकरीता महिला विभाग सुरु केला आहे. त्या विभागाच्या प्रमुख म्हणून श्रीमती शारदा साठे हया काम पहातात. त्यांच्या मदतीला श्रीमती वासंती शेवाळे, श्रीमती अर्चना नाईक, श्रीमती मंगला शिंदे, श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शोभा लोंढे या महिला कार्यकर्त्या आहेत. तसेच रोशनी केंद्राचे काम अॅड.लीला मेहता हया पाहतात. या विभागामार्फत चालूवर्षी खालील कार्यक्रम झाले.

१) १०.४.१९९९ रोजी नवी मुंबई विभागात नगरसेविकांना आलेल्या अनुभवाविषयी खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात सुमारे ४०० महिला सहभागी झाल्या होत्या.

२) १८.६.१९९९ रोजी कायदेविषयक प्रशिक्षण शिबीर कायदेविषयक मोफत सल्ला फोरमच्या मदतीने घेण्यात आले. त्यामध्ये ८० कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. त्या कार्यक्रमात अॅडलीला मेहता, अॅड-बी.एस.कुलकर्णी, अॅड सत्यरंजन धर्माधिकारी, अॅड प्रमोद ढाकळे यांनी महिलाविषयक कायद्याची माहिती दिली.

३) २६.६.९९ रोजी 'एडस्' याविषयी 'शेल्टर इंडिया फाउंडेशन'च्या मदतीने जनजागरण कार्यक्रम झाला. या सभेला ६० कार्यकर्ते हजर होते. श्रीमती वासंती शेवाळे आणि डॉ.माधव साठे यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी कार्यकर्त्यांकडून एडस् याविषयी घोषणा तसेच प्रश्नपत्रिका भरुन घेण्यात आल्या.

४) ६.८.९९ रोजी 'मुलगी झाली हो' व 'हुंडा नको गं बाई ' ही नाटके स्त्री मुक्ती संघटनातर्फे श्रीमती ज्योती म्हापसेकर व त्यांचे सहकारी यांनी सादर केले. या कार्यक्रमास ८० कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

५) दि.२८.९.९९ रोजी हे 'विश्वची माझे घर' व 'मन करावे प्रसन्न' हा कार्यक्रम श्रीमती रेखा नार्वेकर व यांचे सहकारी यांनी सादर केला. त्यामध्ये भक्तिगीते व कथा सादर करण्यात आल्या. यामध्ये ९० कार्यकर्त्या हजर होत्या.

६) दि.६.१०.९९ महिला व्यासपीठातील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी महिला व्यासपीठाच्या कार्यक्रमाच्या कामाचे नियोजन करण्यात येऊन त्याप्रमाणे व्यासपीठाच्या कामाची जबाबदारी कार्यकर्त्यांवर सोपविण्यात आली. तसेच महिला व्यासपीठाचे काम निरनिराळया जिल्हयात पसरविण्यासाठी शिबिर घेण्याचे ठरले. त्यास अनुसरुन सावंतवाडी, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, रायगड, मालवण इत्यादी ठिकाणी शिबिरे घेण्याचे ठरले. 'रोशनी' प्रमुख अॅड लीला मेहता यांनी स्त्री अत्याचारविरोधी मार्गदर्शन शिबीर घेण्याची जबाबदारी स्वीकारली. या कार्यक्रमातंर्गत बचतगट स्थापणे, सहली व मेळावे आयोजित करणे, इत्यादी कार्यक्रम ठरविण्यात आले.

७)   २३.१०.९९ रोजी मुलुंडमधील कार्यालयात कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित केले होते. यामध्ये बचतगट, कुटुंब सल्ला केंद्र याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. बचतगटाविषयी व्हिडीओ कॅसेटद्वारे श्रीमती शोभा लोंढे व श्री आनंद जगताप यांनी मार्गदर्शन केले.

८)   दि.२३.१.२००० रोजी 'स्त्रीहक्क अभियान २०००' या मालिकेतील पहिले पुष्प तळा,जि.रायगड येथे गुंफले गेले. त्या गावातील सुयोग महिला मंडळ व महिला व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमास ७०० महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात स्त्रियांनी आपल्या हक्काबाबत जागरुक होण्याची व त्याबद्दल त्यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. त्यावेळी अॅड लीला मेहता, शारदा साठे, अर्चना नाईक, मंगला शिंदे, शोभा लोंढे, रेखा नार्वेकर यांनी सक्रिय भाग घेतला व मार्गदर्शन केले.

९)   ३०.२.२००० या मालिकेतील दुसरे पुष्प मुलुंड येथे गुंफले या कार्यक्रमास ६० महिला उपस्थित होत्या. संबध दिवसभर स्त्रियांना कायदेविषयक प्रशिक्षण दिले गेले. त्यामध्ये विशेषत: भारतीय संविधान विवाह कायदा, वारसा हक्क, ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर नामवंत वकिलांनी मार्गदर्शन केले.

३१   <u>कृषी व सहकार व्यासपीठ</u> :

सहकार : आत्मनिर्भर सहकारी संस्थांच्या नवीन कायद्यासंबंधीची दोन दिवसांची परिषद वैकुंठभाई मेहता संस्थेमध्ये श्री.मोहन धारिया यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. या चर्चासत्रास श्री.यशवंतराव मोहिते, प्रा.राम मेघे, सहकार आयुक्त श्री.लालासाहेब असे मान्यवर हजर होते. त्याचप्रमाणे सहकारक्षेत्रातील विचारवंत कार्यकर्ते, संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. हया परिषदेत पारित झालेले प्रस्ताव श्री.मोहन धारिया हयांच्या सहीने ना.विलासराव देशमुख,मुख्यमंत्री हयांचेकडे पाठविले. तसेच सदर परिषदेबाबत 'लिंक' या द्वैमासिकाचा विशेषांक काढण्यात येऊन त्याच्या ४००० प्रती महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना पाठविण्यात आल्या. ना.मुख्यमंत्र्यांची व्यासपीठाने पाठविलेल्या मसुद्यावर सहकार विभागातील अधिका-यांच्या बरोबर चर्चा झाली. त्या चर्चेत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्या मुद्यांवर सहकार खात्याचे विशेष आयुक्त श्री.भागवतराव पवार हयांनी श्री.मोहन धारिया, श्री.ज्ञानेश्वर खैरे, श्री.एस.टी.भिडे हयांच्या बरोबर चर्चा करुन सुधारणा सुचविल्या आहेत. विधेयकाचा मसुदा विधीमंडळाकडे मांडण्यासाठी तयार झालेला आहे.

कृषि : व्यासपीठाच्या कृषी विभागामार्फत अॅग्रीकल्चर मार्केटींग या विषयावर काम चालु आहे. महाराष्ट्र राज्य मार्केटींग बोर्ड आणि श्री.भुजबळसाहेब यांच्या मुंबई एज्युकेशन ट्रस्ट येथील संगणक विभागाचे प्रमुख श्री.वसंत शेलार, डॉ.व्ही.आर.पागे, यांच्या मार्गदर्शनाखाली काम चालू आहे. प्राध्यापक श्री.पी.टी.पंडित, श्री.पांडुरंग शा.पवार, निवृत्त उपमुख्याधिकारी, जिल्हा परिषद,पुणे हे प्रतिष्ठानतर्फे काम पाहतात.

कृषि विभागाच्या कामकाजास विशेष चालना देण्याच्यादृष्टीने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या सहकार्याने कार्यक्रम हाती घेतले जात आहेत. तसेच सांगोला येथील डाळिंब

उपक्रमाशी [illegible]. कृषिविभाग व मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या वतीने घेण्यात आलेल्या [illegible] या प्रतिष्ठानचे वतीने सहभाग घेतला.

३२ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :

जनकल्याण [illegible] प्रतिष्ठानच्या कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने पाचप्रकारे कायदेविषयक कार्य चालू असते.

१ वकील आणि गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

२ सामान्य लोकांकरीता विविध कायद्यांची माहिती देणे.

३ कायद्याच्या [illegible] संशोधन करणे व नवीन विधेयकासंबंधी प्रस्ताव तयार करणे.

४ लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

५ न्यायालयाबाहेर समेट घडवून आणणे.

[illegible] वरील उद्दिष्टे साध्य करण्याकरीता अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

कायदेविषयक सल्ला केंद्र : १) महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळात कायदेविषयक सल्ला देण्याकरीता केंद्र सुरु असते. या केंद्रामार्फत नामवंत वकील उपस्थित राहून गरजू लोकांना मोफत सल्ला देत असतात. वर्षभरात १०० पेक्षा जास्त लोकांनी या केंद्राचा लाभ घेतला

२) कायद्याची ओळख : विविध कायद्याची ओळख सामान्य जनतेला होतकरु वकिलांना आणि [illegible] करण्याकरीता कायदेविषयक फोरमने कायद्याची ओळख या व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. यामध्ये व्याख्याते म्हणून राज्यातील तज्ञ, न्यायधीश, आणि माजी न्यायधीश यांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात. अशाप्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री.सुभाष [illegible] यांचे व्याख्यान जनकल्याण प्रतिष्ठानच्या सभागृहात ठेवले होते.

३) पौगंडावस्थेतील मुलींचे व्यक्तिमत्व विकास शिबिरे : इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वीच्या मुलींकरीता या शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. यामध्ये भारतीय राज्यघटना, विवाह कायदा, [illegible] कायदा, [illegible] विषयावर चर्चा स्वरुपात व्याख्याने दिली जातात. यावर्षी मुंबई परिसरातील अनेक शाळांमध्ये एक दिवसाच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन मागील वर्षी करण्यात आले होते. अशी शिबिरे पुढील ठिकाणी घेण्यात आली. [illegible] सिंधवाणी, [illegible] कम्युनिटी सेंटर, डोंबिवली व केळकर कॉलेज, मुलुंड

४) ज्येष्ठ नागरीकांची कार्यशाळा ज्येष्ठ नागरीकांच्या अनेक कार्यशाळांचे आयोजन मुंबई, नवी मुंबई, ठाणे जिल्हा या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये ज्येष्ठ नागरीकांच्या संघांचे सहकार्य

मिळत असते. या कार्यशाळामध्ये ग्राहक संरक्षण कायदा, प्रॉपर्टीचा कायदा, इच्छापत्र, गुंतवणूक आणि सामाजिक/घरगुती प्रश्न या विषयावर चर्चा केली जाते. अशा कार्यशाळा पुढील ठिकाणी घेण्यात आल्या.

१ डी.वाय.पाटील, मेडिकल कॉलेज नेरुळ

२ ए.एफ.ए.सी.इंग्लीश स्कूल हॉल,चेंबूर

५) महिलांची कार्यशाळा. : महिला कार्यकर्त्यांना कायद्याच्या माहितीद्वारे सक्षम बनविण्याकरीता यशवंतराव चव्हाण लिगल फोरमने महिलांकरीता मुंबईत आणि मुंबईबाहेर अनेक कार्यशाळा आयोजित केल्या. यामध्ये महिलासंबंधी कायद्याची व्याख्याने घेण्यात येतात. पुढील ठिकाणी यावर्षी महिलांची कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.

अ) सिडको कम्युनिटी सेंटर,नवी मुंबई

ब) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई

क) रुपारेल कॉलेज,माटुंगा,मुंबई

ड) सी.के.पी.हॉल,विलेपार्ले,मुंबई

ई) विश्वधन को.ऑप.हौ.सो.मुलुंड,मुंबई

३३ विभागीय केंद्र नागपूर :

यशनेट प्रकल्प : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई, 'एज्युकेशन टु होम', पुणे यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय,नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने यशनेट प्रकल्प या वर्षामध्ये तसेच संगणक प्रशिक्षण आणि संगणकाद्वारे शालेय शिक्षण विषयावरील विदर्भातील शिक्षणसंस्था संचालक आणि शिक्षकांसाठी खास संमेलन दि.४.४१९९९ रोजी इंडियन मेडिकल असोशिएशनहॉल, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर येथे आयोजित केले होते. लोकसभेतील तत्कालीन विरोधी पक्षनेते व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.खा.श्री.शरद पवार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून 'एज्युकेशन टु होम' प्रकल्पाचे संचालक, पद्मश्री,डॉ.विजय भाटकर आणि इंदिरा गांधी मुक्तविद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.राम ताकवले हे उपस्थित होते. कार्यक्रमाला विदर्भातील शाळा संचालक व शिक्षकांचा भरघोस प्रतिसाद लाभला होता.

२ भाषिक एकात्मता दिन : श्री गुरुगोविंदसाहेब यांनी स्थापन केलेल्या खालसा पंथाला दि.१३.४.१९९९ रोजी तीनशे वर्षे पूर्ण झाली. या त्रिशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने दि.१३.४.१९९९ हा दिवस भाषिक एकात्मता दिन म्हणून मिडिया आर्टस अ‍ॅण्ड रिसर्च सर्व्हिसेस मार्स आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,नागपूर विभागीय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक डॉ.वसंतराव देशपांडे सभागृह, लक्ष्मीनगर येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी महापौर श्री. अटल बहादूरसिंग आणि प्रमुख पाहुणे नागपूर सुधारप्रन्यासचे तत्कालीन सभापती

खा. श्रीनिवासजी पाटील यांची समयोचित उदबोधपर भाषणे झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे प्रमुख श्री.गिरीश गांधी हे होते. त्यानंतर उर्दू भाषिक कलावंत मिर्झा रफी अहमद बेग यांच्या मराठीतील मिर्झा एक्सप्रेस या एकपात्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपल्या मर्म विनोदी व-हाडी भाषेतील चुटकुले व व्यंगकाव्याद्वारे त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

३ उन्हाळी चित्रकला निःशुल्क शिबीर : नागपूर विभागीय केंद्र आणि रंगप्रवाह एज्युकेशनल अॅण्ड कल्चरल अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्ताने उन्हाळी चित्रकला निःशुल्क शिबीराचे उद्घाटन दि.१५.४.१९९९ मा.भन्ते नागार्जुन सुरई ससाई यांच्या शुभहस्ते वनराई सभागृह, रामनगर,नागपूर येथे संपन्न झाले. दि.१५ एप्रिल ते १५ मे हा एक महिना चाललेल्या या शिबिराचे संचालक सुप्रसिध्द चित्रकार श्री.सुभाष ससराम हे होते.

४ सुरेल शब्द : नागपूर विभागीय केंद्र आणि नाटयवलय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१८ एप्रिल १९९९ रोजी वनराई सभागृह, रामनगर येथे कै.सखारामपंत जोशी आणि कै.शरद आंबेकर स्मृती पुरस्कार वितरण समारंभ आणि मराठी नाटय संगीतातील रागदारी या विषयावरील नाविन्यपूर्ण सुरेल शब्द कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सुप्रसिध्द गायक श्री.अनिरुध्द देशपांडे आणि सहका-यांनी सादर केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी श्रीमती नलिनीताई टिवाडकर या होत्या. कार्यक्रमाच्या आयोजनात श्रीमती कमलताई आंबेकर यांचे सक्रिय सहकार्य लाभले.

५ घई छंद मकरंद : महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने १ मे १९९९ रोजी स्थानिक सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे वैदर्भिय नाटककारांच्या नाटकातील पदांवर आधारित घई छंद मकरंद हा नाटयसंगीताचा बहादार कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजक श्री.भाऊ लाडसे हे होते. ज्येष्ठ संगीततज्ञ गायक प्रभाकर देशकर, श्री.भाऊ भट लांडसे, श्री.अनिरुध्द देशपांडे सौ.वैशाली देशमुख, कु.रुपाली सराफ इत्यादी गायक कलावंतांनी नाटकातील नाटयपदे सादर केली. कार्यक्रमाचे निवेदन प्रा.हेमा गोखले यांनी केले. कार्यक्रमाला लोकमत मुंबईचे संपादक, श्री.मधुकर भावे. आणि नागपूर सुधार प्रन्यासाचे सभापती श्री. श्रीनिवासजी पाटील आवर्जून उपस्थित होते.

६ कै.श्रीकांत कुलकर्णी स्मृती व्यक्तिमत्व विकास शिबीर : शालेय विद्यार्थ्यांसाठी दि.२६ एप्रिल ते १६ मे या कालावधीत कै.श्रीकांत कुलकर्णी स्मृति व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या व्यक्तिमत्व विकास शिबिराचा समारोप समारंभ दि.१६ मे १९९९ म.फुले सांस्कृतिक भवन,रश्मिबाग येथे तत्कालीन निगमायुक्त मा.श्री.शिवाजीराव देशमुख यांचे हस्ते संपन्न झाला सुप्रसिध्द युध्दकथाकार डॉ.विनय वाईकर आणि केशवराव यावलकर प्रमुख अतिथी म्हणून

उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.देवेंद्रकुमार झाडे हे होते. शिबीर संचालिका म्हणून श्रीमती माधवी इंगोले यांनी जबाबदारी सांभाळली. शिबिर आयोजनात मनुष्यबळ व भारतीय विकास संस्थेचे सहकार्य लाभले होते.

७ इर्फिज वर्ल्ड : राष्ट्रीय पातळीवरील व्यंगचित्रकार इर्फान हुसेन या मनस्वी कलावंताला श्रध्दांजली म्हणून नागपूर विभागीय केंद्र आणि स्पंदन सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० मे ते २३ मे या कालावधीत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या कलावियिकामध्ये इर्फान हुसेन यांच्या व्यंगचित्रांचे 'इर्फिज वर्ल्ड' हे प्रदर्शन आयोजित केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिध्द साहित्यिक प्रा.सुरेश दशिरवार यांच्या हस्ते व सुप्रसिध्द व्यंगचित्रकार श्री.मनोहर सप्रे यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.गिरीश गांधी होते. कार्यक्रमाला इर्फान हुसेन यांचे वडील व मन्सूर हुसेन यांचेसह इर्फान कुटुंबिय तसेच दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालिका श्रीमती रश्मि शुक्ला आवर्जून उपस्थित होत्या. इर्फानच्या जवळजवळ ७०० व्यंगचित्रांच्या या प्रदर्शनाला सुमारे २००० रसिकांनी भेट दिली.
हे प्रदर्शन मुंबई येथेही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये दि . १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २००० या कालावधीत आर्ट गॅलरीमध्ये आयोजित केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा.श्री.मोहन धारिया यांच्या शुभहस्ते आणि मुंबईचे शेरीफ डॉ.ए.एफ पिंटो यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकसत्ता मुंबईचे संपादक डॉ.अरुण टिकेकर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गिरीश गांधी यांनी केले. आभारप्रदर्शन श्री.जितेंद्र गोस्वामी यांनी केले. प्रदर्शनाच्या आयोजनात श्री.विजय देसाई आणि श्री.सुधाकर शेट्टी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

८ पंडित जवाहरलाल नेहरु पुण्यतिथी समारोह स्व.पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि.२७ मे ९९ रोजी लोकसत्तेचे निवासी संपादक प्रा. सुरेश द्वादशवार यांचे 'गणराज्यांची ५० वर्षे व आजची स्थिती' याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी सर्वश्री, गिरीश गांधी, अनंतराव धारड, विजय जिचकर, माधव घुसे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री.विवेक खेर यांनी केले.

९ चित्रकला प्रक्षिशक्षण शिबिर समारोह : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,नागपूर विभागीय केंद्र व रंगप्रभा एज्युकेशन ॲण्ड कल्चरल अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ एप्रिल ते १५ मे ९९ या कालावधीत म.फुले हायस्कूल मिलिंदनगर येथे उन्हाळी चित्रकला निःशुल्क शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिवीराचा समारोप व चित्रकला प्रदर्शन पुरस्कार वितरण दि. २८ मे १९९९ रोजी साय.५.३० वाजता संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री.इ.मो.नारनवरे हे होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी श्री.गिरीश गांधी यांचे हस्ते प्रशिक्षणार्थींना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

१० निरोप समारंभ : नागपूर सुधार प्रन्यासाचे सभापती श्रीनिवासजी पाटील,सेवानिवृत्त झाले. नागपुरातील त्यांचे वास्तव्य आणि सहवास सामाजिक व सांस्कृतिक संस्थांना प्रोत्साहित करणारा होता. याप्रसंगी त्यांना स्नेहपूर्ण निरोप देण्यासाठी सोमवारी दि.५ जुलै ९९ रोजी वनराई सभागृहात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

११ रानवाटा : यशवंतराव चव्हाण विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सुप्रसिध्द पक्षीतज्ञ आणि वनसाहित्यिक श्री.मारुती चितमपल्ली यांच्या साहित्यवाचनाचा अभिनव कार्यक्रम रानवाटा, रविवार दि.११ जुलै ९९ रोजी सकाळी ९ वाजता वनभवन हिरवळ सेमिनरी हिल्स येथे आयोजित करण्यात आला. रानवाटा या कार्यक्रमात सुप्रसिध्द कलावंत श्री.रविंद्र दुरुगकर, सौ.शुभा साठे आणि स्वतः मारुती चितमपल्ली सहभागी झाले होते. याप्रसंगी कै.शांता योगी स्मृति ग्रंथ पुरस्कार सौ.प्रणिता माल्पेकर यांना देण्यात आला. बसोलीच्या बालचित्रकारांनी श्री.मारुती चितमपल्ली याच्या वनसाहित्यावर आधारित काढलेल्या चित्रांचे आणि ग्रंथसहवासतर्फे वन साहित्याचे प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते.

१२ अभिनय कार्यशाळा : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान नागपूर विभागीय केंद्र आणि कलाभारती अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्‌घाटन सुप्रसिध्द नाटय चित्रपट कलावंत श्री.निळू फुले यांचे हस्ते अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्री.विलास इंगोले, श्री. वसंतराव राऊरकर यांचे प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि.१३ जुलै ९९ रोजी संपन्न झाले. शिबिर संचालक म्हणून विभागीय केंद्राचे निमंत्रित सदस्य डॉ.सतीश पावडे हे होते. याच दिवशी साय.६ वाजता श्रीमती विमलताई देशमुख सभागृह, अमरावती येथे ख्यातनाम नाटयचित्रपट अभिनेते आणि नाटयगौरव पुरस्कार विजेते मा.निळू फुले यांचा जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणमंत्री प्रा.राम मेघे हे होते.

१३ अंदमान- एक अनुभव स्लाईड शो : अंदमानाची माहिती तसेच येथील प्रगती, प्राकृतिक सौंदर्य, जनजीवन आणि ऐतिहासिक सेल्युलर जेल आदि विषयांवरील निवेदनासह स्लाईड शो चा कार्यक्रम स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने रविवार दि.१५ ऑगस्ट ९९ रोजी श्री.जालंदर सोनुने यांनी वनराई सभागृह येथे सादर केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिध्द विचारवंत डॉ.वि.स.जोग हे होते. हा कार्यक्रम कारगिल शहिदांच्या स्मृतिस समर्पित होता.

१४ पंचायत राज प्रशिक्षण कार्यशाळा राष्ट्रपिता म.गांधी जयंतीनिमित्त शनिवार दि.२ ऑक्टो ९९ रोजी नागपूर जिल्हयातील सरपंचासाठी पंचायत राज प्रशिक्षण या विषयावरील एक

दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक जवाहर विद्यार्थी सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यशाळेचे उद्‌घाटन तत्कालीन पालकमंत्री मा.ना.श्री.नितीन गडकरी यांच हस्ते, वनराई विदर्भ विभागाचे अध्यक्ष मा.श्री.दत्ताभाऊ मेघे यांचे अध्यक्षतेखाली आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईचे विश्वस्त व माजी मंत्री श्री.हुसेन दलवाई यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित 'नवे पंचायत राज्य' या पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर नागपूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सर्वश्री. रमेश मानकर, अनंत धारड, विजय जिचकर, अनिल देशपांडे, शैल जेमिनी, प्रेमबाबू लुनावत तसेच नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकरी श्री.एन.जे.गजभिये प्रामुख्याने उपस्थित होते. श्री.गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेला राज्यशास्त्राचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.प.ल.जोशी हिस्लॉप महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे सेवानिवृत्त विभाग प्रमुख प्रा.एम.टी.पिंप्रिकर, तसेच चंद्रपूरचे माजी खासदार व केंद्रीयमंत्री मा.श्री.शांतारामजी पोटदुखे यांनी मार्गदर्शन केले. तसेच अमरावतीचे श्री.मधु धारड आणि वनराई परिवारातील प्रा.चंद्रभान भोयर यांनी देखील प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कार्यशाळेला नागपूर जिल्हयातील जवळपास सातशे ते साडेसातशे सरपंच व उपसरपंच उपस्थित होते.

१५ असा मी नटसम्राट : एकपात्री कार्यक्रम :

विदर्भातील सुप्रसिध्द अभिनेते आणि अनेक रौप्य पदके व पुरस्काराचे मानकरी श्री.प्रभाकर आंबोणे यांचा 'असा मी नटसम्राट' हा एकपात्री कार्यक्रम शनिवार दि.४ डिसेंबर ९९ रोजी. सायं.७.०० वा.छबिलदास मुलांची शाळा, दादर, मुंबई येथे शेफाली युनिटद्वारा सादर करण्यात आला. स्वयं.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवार दि.२५ नोव्हें ९९ रोजी स्थानिक कामगार कल्याण मंडळ, रघुजीनगर येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लोकसत्तेचे निवासी संपादक प्रा.सुरेश द्वादशीवार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला डॉ.बाबासाहेब आकरे प्रमुख अतिथी म्हणून उपथित होते. याप्रसंगी डॉ.सतीश पावडे लिखित व दिग्दर्शित आणि कलाभारती अमरावती प्रस्तुत नक्षलवादी चळवळीवर आधारित चक्रव्युव्ह ही एकांकिका सादर करण्यात आली. त्यानंतर परिवर्तनासाठी नक्षलवादी चळवळी को दहशत या विषयावरील परिसंवाद प्रा.सुरेश दाद्वशीवार, पत्रकार श्री.गजानन जानभोर आणि डॉ.सतीश पावडे इत्यादी वक्त्यांनी आपले विचार मांडले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आकरे हे होते. व्यासपीठावर कामगार कल्याण उपायुक्त श्री.परांडेकर, श्री.अनंत धारड उपस्थित होते.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या डिप्लोमा इन अॅडव्हान्स कॉम्प्युटींग (डीएसी) ची लॅबोरेटरी.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या डिप्लोमा इन इन्फोरमेशन टेकनॉलॉजी (डीआयटी) ची लॅबोरेटरी.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या डिप्लोमा इन अॅडव्हान्स कॉम्प्युटींग (डीएसी) चा वर्ग




डावीकडून : श्रीमती रेखा नार्वेकर, श्री भोरधर (नॅशनल बुक ट्रस्ट), श्री शरद काळे, श्री ज्ञानेश्वर खैरे, श्री जयवंतराव साळगांवकर व डॉ. रवि बापट



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय



एक रंगलेली गाण्याची मैफील



श्रीमती रेखा नार्वेकर यांनी सादर केलेला सांस्कृतीक कार्यक्रम



"कायदे विषयक सहाय्य व सल्ला" या विभागाच्या वतीने कायस्थ प्रभू मंडळात झालेला कार्यक्रम



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई - महाराष्ट्र महिला व्यासपीठ - "स्त्री हक्क अभियान" अंतर्गत तळे जि. रायगड येथे कार्यक्रम संपन्न झाला. तळे येथे उपस्थित असलेले महिला व्यासपीठाचे कार्यकर्ते.



फलठण यूथ फौंडेशन व नवभारत युवा आंदोलन आयोजित निबंध वक्तृत्व स्पर्धा (शिवाजी विद्यापीठ) सहभागी विद्यार्थी वक्तृत्व सभेत भाषण करताना.

१६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ४३ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने सोमवार प्रदिप आगलावे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. वनराई सभागृह रामनगर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.प.ल.जोशी हे होते. श्री.गिरीश गांधी यांनी प्रास्ताविकपर भाषण केले.

१७ वृक्षवल्ली आम्हा सोयरी : छायाचित्रांचे प्रदर्शन

माजी वित्तमंत्री व मा.आमदार महादेवराव शिवणकर यांनी सुध्दा फोटोग्राफीचा छंद जोपासला आहे. वन्य परिसरातील त्यांनी कॅमेराबध्द केलेले काही अलौकिक क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' या प्रदर्शनाद्वारे रसिकांसाठी सादर करण्यात आले. दि. १७ ते १९ डिसेंबरपर्यंत सर्वांसाठी खुले असलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे वन व पर्यावरणमंत्री मा.श्री.सुरुपसिंग नाईक यांचे हस्ते व ज्येष्ठ वनसाहित्यिक पक्षीतज्ञ श्री.मारुती चितमपल्ली यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वन व पर्यावरण राज्यमंत्री मा.श्री.सुभाष ठाकरे हे होते. दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या कलाविथीका येथे आयोजित करण्यात आला. या प्रदर्शनाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

१८ नागपूर विद्यापीठ मराठी विभागातील प्रसिध्द काव्य समिक्षक डॉ.अक्षयकुमार काळे यांना वाङ्मय पंडित या सर्वोच्च पदवीने नुकतेच सन्मानित करण्यात आले. त्याप्रित्यर्थ नागपूर विद्यापीठ मराठी स्नातकोत्तर विभाग, धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, पा.ना.वलहट्टी प्रकाशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनंदन सोहळा आणि 'समकालीन काव्यप्रवाह' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन शनिवार दि.१८ डिसेंबर रोजी स्थानिक गांधी भवन, शंकरनगर येथे करण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री मा.ना.दिलीप वळसे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या अभिनंदन सोहळयाला ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ना.अनिस अहमद, आमदार.रामदास फुटाणे, श्री.गिरीश गांधी, श्री. प्रभाकरराव मुंडले, मराठी विभाग प्रमुख श्री.मदन कुलकर्णी इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.जयंत परांजपे यांचे अध्यक्षतेखाली समकालीन काव्यप्रवाह या विषयावरील परिसंवादात डॉ.आशा सावदेकर-भाव कविता, प्रफुल्ल शिलेदार-नवकविता, डॉ.वि.स.जोग, साम्यवादी कविता-प्रा.अनिल निनतवरे, दलित कविता-डॉ.विनायक तुकाराम, आदिसार्वी कविता आणि डॉ.अक्रम शेख-मुस्लिम कविता इत्यादी महनीय वक्त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

१९ महिला नाटककारांच्या नाटकांचा महोत्सव :

पद्मगंधा प्रतिष्ठान,नागपूरच्या सहकार्याने नागपूरातील नाटयलेखिकांच्या नाटकांचा महोत्सव दि.२३ व २४ डिसें रोजी ९९ स्थानिक देशपांडे सभागृह, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला. महोत्सवाचे उदघाटन सुप्रसिध्द लेखिका डॉ.शकुंतला खोत यांचे हस्ते व श्री.गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. अशाप्रकारचा उपक्रम संपूर्ण विदर्भात पहिल्यादाच आयोजित केला. २३ डिसें रोजी सौ.माला केकतपुरे लिखित व श्री.सतीश खेकाळे दिग्दर्शित 'पुन्हा वसंत केव्हा फुलेल' हे दोन अंकी नाटक सादर करण्यात आले. दि.२४ डिसें, 'झुंजुमुंजू झाल' ही एकांकिका तसेच सौ.अर्चना दहासहस्त्र लिखित व दिग्दर्शित 'उखाण्यांची फुलारी' ही लोकनाटय संगितिका सादर करण्यात आली. दि.२५ डिसें रोजी रंजन कला मंदिर नागपूर निर्मित आणि मुकुंद सरवटे दिग्दर्शित 'शांतेच कार्ट चालू आहे' या नाटकचा प्रयोग सादर करण्यात आला.

२० एरो मॉडेलिंग शो (विमान प्रात्यक्षिके) :

युवा स्नेह आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,नागपूर विभागीय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१३ फेब्रुवारी २००० रोजी पं.जवाहरलाल नेहरु स्टेडियम, जुना सुभेदार लेआऊट येथे 'एरो मॉडेलिंग शो' चे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन समारोहाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सरचिटणीस श्री.अनंत धारड हे होते. आमदार श्री.मोहन मते यांचे हस्ते उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री.प्रमोद दवणे व सौ.अर्चना डेहनकर उपस्थित होते. सुमारे अडीच ते तीन हजार शालेय विद्यार्थी व लोकांनी या शो चा आनंद घेतला.

२१ स्व.यशवंतराव चव्हाण जयंती समारोह :

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि भारताचे माजी उपपंतप्रधान स्व.यशवंतराव चव्हाण यांचा ८७ वा जयंती समारोह रविवार दि.१२ मार्च २००० रोजी सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला. या निमित्ताने स्व.यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्व व कर्तृत्व परिसंवादाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ साहित्यिक विद्यावाचस्पती प्राचार्य राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिसंवादात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सामाजिक व वाङमयीन महत्वाच्या विषयावरील अधिकारी व्याख्याते, महाराष्ट्र राज्य संस्कृति मंडळाचे सदस्य डॉ.निर्मलकुमार पडकुले,सोलापूर यांनी 'साहित्यिक यशवंतराव' याविषयावर तर पुण्याच्या एस.पी.कॉलजेच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख तसेच भारतीय लोकप्रशासन नवी दिल्लीचे सदस्य व राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ.विजय देव,पुणे यांनी 'यशवंतरावजी राजकीय प्रज्ञा व वाटचाल' या विषयावर ज्येष्ठ सामाजिक व राजकीय विचारवंत आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य, नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.भा.ल.भोळे यानी सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील 'यशवंतरावजीचे योगदान' या विषयावर आपले विचार मांडले.

२२ पहिलीपासून इंग्रजी विकास की आत्मघात-परिसंवाद :
महाराष्ट्र शासनाने जून २००० पासून सुरु होणा-या शैक्षणिक सत्रापासून इयत्ता पहिलीपासून इंग्रजी हा विषय सुरु करण्याचा धाडसी निर्णय घेतला, म्हणून या महत्वपूर्ण विषयावरील परिसंवादाचे आयोजन शुक्रवार दि.२४ मार्च २००० रोजी वनराई सभागृह,रामनगर येथे करण्यात आले. प्रा.राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिसंवादात प्रा.हरिभाऊ केदार, भाषाशास्त्रज्ञ डॉ.कुलकर्णी, डॉ.भा.ल.भोळे, डॉ.ओमप्रकाश मिश्रा, इत्यादी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.गिरीश गांधी यांनी तर सुत्रसंचालन श्री.विवेक खेर आणि आभार प्रदर्शन आनंद धारड यांनी केले. कार्यक्रमाला पालकांची बहुसंख्य उपस्थिती होती.

२३ यशवंतराव चव्हाण जयंती समारोह : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, भारताचे माजी उपपंतप्रधान स्व.यशवंतराव चव्हाण यांचा जयंती समारोह अमरावती येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण यांचे निकटचे स्नेही माजी खासदार, भैयासाहेब जवादे तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.मनोज तायडे उपस्थित होते. या कार्यक्रमाला निसर्गमित्र दमाळे नाटयकर्मी,सुरेश वारसे, कवी अजय खडसे, इत्यादी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

३४ <u>कराड केंद्र</u> :

१) १ मे ९९ महाराष्ट्र स्थापनदिन : सौ.वेणूताई चव्हाण स्मारक भवनमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, यशवंतराव चव्हाण' या विषयावर प्रा.डॉ.कन्हैया कुंदप यांचे व्याख्यान सायं ५ ते ६.३० या वेळात आयोजित केले होते. व्याख्यानास ३५० वर विद्यार्थी उपस्थित होते.

२) १ जून ९९ : सौ.वेणूताई चव्हाण यांची १६ वी पुण्यतिथी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही साजरी करण्यात आली. त्यानिमित्त रात्री ९.३० ते १२ वाजेपर्यन्त सौ.वेणूताई चव्हाण स्मारक भवन येथे राष्ट्रीय ख्यातीचे पंडीत प्रकाशजी माळुखे पुणे यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला.

३) २ ऑक्टोबर ९९ म.गांधी जयंती : म.गांधीजयंती निमित्त कराड केंद्रातर्फे सौ.वेणूताई स्मारक भवन येथे सकाळी ८.३० ते ९.३० या वेळात ॲडव्होकेट व स्वातंत्र्यसैनिक, श्री.डी.एम.पाटील,कराड यांचे गांधींचे आचार-विचार याविषयावर व्याख्यान संपन्न झाले.

४) महिला कार्यकर्त्यांकरीता कार्यशाळा : स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या १५ व्या स्मृतिदिनानिमित्त कराड केंद्र सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या चार जिल्हयातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदा, महानगरपालिका यामधील महिला सदस्या, महिला सरपंच, महिला कार्यकर्त्या यांची कार्यशाळा शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने २५.११.९९ रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेत २४० पर्यन्त महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. शिवाय १५० स्थानिक महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. प्रा.पी.बी.पाटील, डॉ.अनुराधा गुरव, प्रा.डॉ.निर्मला हालंकर, प्रा.विजया पाटील, ॲड उषा भंडा, प्रा.विमला पाटील, इत्यादी महिला कार्यकर्त्यांनी महिला कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

५)   २५.११.९९   सौ.वेणूताई चव्हाण स्मारक भवनामध्ये मा. शरद पवार, मुख्यमंत्री,मा.विलासराव देशमुख, मा.छगन भुजबळ,उप मुख्यमंत्री इत्यादी मान्यवरांचे आगमन झाले. स्व.चव्हाणसाहेब व वेणूताई यांच्या पुतळयास पुष्पहार घालून दिप प्रज्वलन करुन स्मारक भवन येथील वस्तु संग्रहालय व ग्रंथालयाची पाहणी केली. सौ.वेणूताई चव्हाण स्मारकाच्या विश्वस्तांची बैठक मा.शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यानंतर विरंगुळा वास्तूस भेट देण्याचा कार्यक्रम झाला. या सर्व कार्यक्रमांच्या अगोदर प्रतिसंगमावरील चव्हाणसाहेबांच्या समाधीचे दर्शन व पुष्पचक्र अर्पण करण्यास सर्व मान्यवर उपस्थित राहिले.

६)   प्रौढ व निरंतर शिक्षण योजना शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांचा ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम उद्घाटन सोहळा. :

प्रौढ व निरंतर शिक्षण योजना शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर या उपक्रमांतर्गत प्रा.अनुराधा व श्री.वि.वि.पाटील यांच्या परिश्रमाने ग्रंथपाल प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला. या तीन महिन्याच्या वर्गासाठी शिवाजी विद्यापीठाची मान्यता मिळाली. हा उद्घाटन सोहळा २१ जानेवारी २००० रोजी श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे विठामाता विद्यालय,कराड येथे कराडचे आमदार श्री.शामराव पांडुरंग उर्फ बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करुन संपन्न झाला. कार्यक्रमास कराड येथील महाविद्यालयीन व विद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथालयीन सेवक, कार्यकर्ते व प्राध्यापक इत्यादी असे १५० चे वर उपस्थिती होती.

७)   राज्य घटना सुवर्ण महोत्सवी चर्चासत्र : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई विभागीय केंद्र कराड आणि स्वातंत्र्य संग्राम स्मृती संस्था सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१३ फेब्रुवारी २००० रोजी शांती निकेतन लोकविद्यापीठ, माधवनगर रोड, सांगली येथे राज्यघटना सुवर्ण महोत्सवी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. भारतीय राज्यघटना व भारताचे भवितव्य या विषयावरील या चर्चासत्राचे उद्घाटन माजी खा.रा.सु.गवई यांनी केले. या कार्यक्रमांत आचार्य शांताराम गरुड व राज्याचे कायदामंत्री विलासराव पाटील,उंडाळकर यांनी भाषणे देऊन मार्गदर्शन केले.

८)   २५ फेब्रुवारी २००० महिला मेळावा : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईचे विभागीय केंद्र,कराड व भैरवनाथ महिला मंडळ आणि जिजामाता महिला मंडळ, मु.पो.तांबवे, ता.कराड यांच्या संयुक्त विद्यमाने तांबवे व आसपासच्या पंचक्रोशतील महिलांचेसाठी मार्गदर्शनपर महिला मेळावा आयोजित केला होता. मेळाव्याचे उद्घाटन मा.पी.डी.पाटील, संस्थापक सहयाद्री सह.सा.कारखाना लि.यशवंतनगर यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी तांबवेचे सरपंच पांडुरंग ज्ञानदेव पाटील होते. या मेळाव्यामध्ये स्त्री शिक्षण व संस्कार, आरोग्य व संगोपन, कायदा, महिलांची मानसिकता या विषयावर भाषणे व प्रश्नोत्तरे झाली. या सभेत पी.डी.पाटील यांनी मार्गदर्शन केले. सौ.विद्या पाटील यांनी स्वागत केले. सौ.सुनिता पाटील यांनी सुत्रसंचालन केले. दुपारच्या सत्रात विविध विषयावर व्याखाने व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. 'स्त्री शिक्षण आणि संस्कार' याविषयावरील प्रा.सौ.निर्मला घोरपडे, 'महिलासाठीचे कायदे या विषयी ॲड उषा भेदा यांनी मार्गदर्शन केले. महिलांची मानसिकता या विषयावर प्रा.शोभना रैनाक यांचे व्याख्यान झाले.

'महिलांच्या आरोग्यविषयक समस्या व त्याविषयी दक्षता' या विषयावर डॉ.वर्षा देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यास तांबवे परिसरातील महिला उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या शंका व प्रश्नाविषयी चर्चा केली. सौ.नंदा पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी काशिनाथ देशमुख, प्रतिष्ठानचे अध्यक्ष जालिंदर पाटील, ॲड डी.एम.पाटील, विठ्ठल पाटील, शामराव पवार, का.रघुनाथ चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्या विजया पाटील व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राच्या पदाधिका-यांनी परिश्रम घेतले.

९. ८ मार्च २००० आंतरराष्ट्रीय महिला दिन :

कराड विभागीय केंद्रातर्फे सातारा,सांगली,कोल्हापूर, सोलापूर या चार जिल्हयांतील महिला कार्यकर्त्यांची सभा ८ मार्च २००० रोजी सांगली येथे दुपारी १ ते ५.३० वाजेपर्यन्त संपन्न झाली. सभेस चारही जिल्हयांतून १४४ महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मा.मालन मोहिते यांनी सभेचे अध्यक्षस्थान भुषविले. डॉ.अनुराधाताई गुरव, प्रा.विजया पाटील, कोल्हापूर, सांगली जि.प.सदस्या सौ.छायाताई पाटील व सौ.सरोज पाटील, महिला बँकेच्या अध्यक्षा, डॉ.हेमलता कोठारी, सांगली, डॉ.विमला पाटील, सौ.प्रभाताई सूर्यवंशी, प्रा.निर्मला घोरपडे, सौ.चंद्रिका टेमाई, प्रा.पी.बी.पाटील, ॲड डी.एम.पाटील, विठ्ठलराव पाटील, कराड या सर्वांनी 'स्त्रियांच्या महत्वाच्या विविध प्रश्नांवर स्त्री शिक्षण, ग्रामीण पातळीवरील सर्व ठिकाणी प्रसुतिगृहाची सोय करणे, मानसिकता, आरोग्य, ग्राहक संरक्षण कायदा व स्त्रियासंबंधी इतर कायदे, कुटुंबाबरोबरच समाजाचाही विकास स्त्रियांनी केला पाहिजे'. यासंबंधी विचार मांडले. याच सभेत चार जिल्यामधील प्रत्येक जिल्हयातील एक महिला कर्यकर्त्यांची कमिटी स्थापन करण्याचे ठरले. या महिला कार्यकर्त्यांमधूनच पुढे विभागीय केंद्राची चार जिल्हयांसाठी एक महिला कमिटी (महिला व्यासपीठ) म्हणून स्थापन करण्याचे ठरविण्यात आले.

१० स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्याचे ग्रंथ, गौरवांक, विशेषांक इ.चे ग्रंथप्रदर्शन साहेबांच्या विविध प्रसंगाचे वेळी घेतलेल्या निवडक ४०० फोटोंचे प्रदर्शन साहेबांच्या 'विरंगुळा' बंगल्यामध्ये भरविले होते. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन मा.पी.डी.पाटील यांचे शुभहस्ते सकाळी ठीक ९.०० वाजता झाले. प्रदर्शन सायंकाळी ८ वाजेपर्यन्त सर्वांना खुले होते. या वेळेत जवळजवळ तीन हजारांचे वर विद्यार्थी, विद्यार्थीनी, स्थानिक व परगांवच्या व्यक्तींनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. नगरपालिका, नगरवाचनालय कराड व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराड, यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. दि.१० व ११ रोजी मुंबई लोकसत्ताचे संपादक डॉ.अरुण टिकेकर यांचे 'महाराष्ट्र राजकारण आणि संस्कृती' या विषयावर सलग दोन व्याख्याने व १२ व १३ मार्च रोजी श्री. नरेंद्र चपळगांवकरमाजी न्यायमूर्ती मुंबई उच्च न्यायालय, ,औरंगाबाद, यांचे 'लोकशाहीचे व्यवस्थापन' या विषयावर सलग दोन व्याख्याने आयोजित केली होती. या चारही व्याख्यानाचा प्राध्यापक, महाविद्यालयीन विद्यार्थी व स्थानिक व्यक्ती मिळून दररोज ७०० च्यावर श्रोत्यांनी लाभ घेतला.

११) **कामेरी महिला मेळावा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराडचे महिला व्यासपीठ, ग्रामीण उद्योन्मुख सहकारी पतसंस्था,कामेरी व अंगणवाडी कार्यकर्त्यांच्यावतीने कामेरी येथील झालेल्या प्रांगणात २६.३.२००० रोजी भव्य मेळावा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी लक्ष्मी

सहकारी बँकेच्या संचालिका सौ. नलिनी पाटील होत्या. मेळाव्यास कामेरी व परिसरातील सुमारे ५०० महिला व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. कराड जनता सहकारी बँकेचे व्यवस्थापक व माजी चेअरमन विलासराव पाटील-वाठारकर यांनी दिप प्रज्वलन करून उदघाटन केले. नंतर १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील कामेरीचे हुतात्मा विष्णु बारवटे यांच्या पत्नीचा सत्कार करण्यात आला. स्वातंत्र्यसैनिक अॅड डी. एम. पाटील यांनी प्रास्ताविक भाषण केले. डॉ. वर्षा देशपांडे, अॅड मनिषा शेटे वाळवा पंचायत समिती सदस्य रश्मी कुलकर्णी यांचे महिलाचे सामाजिक स्थान या विषयावर बोधपर भाषणे व प्रश्नोत्तरे झाली. मेळाव्याच्या प्रारंभी केंद्राचे सचिव, श्री. विठ्ठल पाटील, सौ. सुनिता पाटील, सौ. रेशना कोरे, सौ. चंद्रिका देसाई, सौ. छाया पाटील, श्रीमती. जया गरवारे यांचा सत्कार करण्यात आला.

## ३५ पुणे विभागीय केंद्र

पुणे विभागीय केंद्रासाठ सह्याद्री सदन, टिळक रोड, पुणे येथे स्वतंत्र ऑफिससाठी जागा घेतली असून स्वतंत्र टेलिफोनची व्यवस्था केली आहे. कार्यालय नियमित १० ते ५ पर्यंत चालू असते. पुणे विभागाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर खैरे (प्रतिष्ठानचे विश्वस्त) हे आहेत. श्री. अंकुश काकडे, माजी महापौर श्री. शांतिलाल सुरतवाला माजी महापौर, श्री. मिहिर थत्ते, श्री. सुनिल महाजन, श्री. भैय्यासाहेब खैरे हे पुणे विभागाचे काम पाहतात.

### वनराई संस्था, पुणे ह्यांच्या सह्यागाने विधायक कार्यक्रम

पुणे विभागीय केंद्राचे वनराई संस्थेबरोबर विविध क्षेत्रात भरीव कार्यक्रम चालू आहेत. ह्या कार्यक्रमात श्री. मोहन धारिया कार्याध्यक्ष ह्यांचा सक्रिय सहभाग आणि मार्गदर्शन असते. कृषी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन ना. अशोक गेहलोत साहेब, मुख्यमंत्री, राजस्थान सरकार ह्यांचे हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी श्री. मोहन धारिया होते. या खेरीज दुग्धविकास, फलोद्यान ह्या विषयांवर एक, एक दिवसांची प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यात आली होती.

### ग्रामीण विकास शिबीर

भारत सेवक समाजाबरोबर पुणे विभागाने दोन दिवसांचे भारत सेवक समाजाच्या कार्यकर्त्यांचे शिबीर आयोजित केले होते. आदरणीय बाळासाहेब भारदे, पद्मश्री अण्णासाहेब हजारे आणि इतर वयोवृद्ध कार्यकर्ते हजर होते.

### राष्ट्रसेवा दलाचे प्रशिक्षण शिबीर

हे प्रशिक्षण शिबीर राष्ट्रसेवादल आणि प्रतिष्ठान यांनी राष्ट्रीय ज्वलंत प्रश्नावर आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी श्री. मोहन धारिया होते.

### युवक मेळावा

श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पुरंदर ह्या संस्थेच्या सह्योगाने पुरंदर तालुक्यात दोन दिवसांच्या व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात २० संघांनी सहभाग घेतला. दोन दिवस २०० युवक हजर होते. त्यांना सकाळ संध्याकाळ श्री. एस. टी. भिडे आणि प्रा. पी. टी. पंडीत ह्यांनी सहकारी चळवळ आणि ग्रामिण विकास ह्या विषयांवर मार्गदर्शन केले. विजयी संघांना 'यशवंतराव चव्हाण चषक' बक्षिस देण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे संयोजन श्री. भैय्यासाहेब खैरे यांनी केले होते.

## यशवंतराव चव्हाण जयंती आणि पुण्यतिथी

१२ मार्च आणि २५ नोव्हेंबर रोजी पुरंदर तालुक्यात श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पुरंदर ह्या संस्थेच्या सहयोगाने ३० माध्यमिक शाळांमधून कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांचे नियोजन श्री. भय्यासाहेब खैरे यांनी केले होते.

## जागतिक महिला दिन

महिला दिनाचा कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिरात संवाद ह्या संस्थेच्या सहयोगाने आयोजित केला होता. अनेक नामवंत महिला कलावंत उपस्थित होत्या. श्री. सुनील महाजन आणि श्रीमती लीला गांधी ह्यांनी संयोजक म्हणून कार्यक्रम यशस्वी केला.

## पुणे शहर आणि जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांचे फेडरेशन

३५ स्वयंसेवी संस्थांची बैठक आयोजित करून स्वयंसेवी संस्थांची संसद स्थापन करण्यात आली. ह्याचे अध्यक्ष श्री. मोहन धारिया असून डॉ. घारे कार्याध्यक्ष आहेत.

विधायक क्षेत्रात भरीव काम करण्याचा कार्यक्रम तयार करण्यात येणार आहे.

## भारताच्या अर्थमंत्र्यांकडे निवेदने सादर

केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात पुढील वर्षात कृषी सहकार क्षेत्रासाठी काय तरतुदी असाव्यात या संबंधी तज्ञ व विचारवंतांचे चर्चासत्र आयोजित केले होते. त्यासंबंधी प्रतिष्ठानच्या शिफारशी प्रस्ताव रूपाने श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष यांचे सहीने पाठविले.

## सहकार सप्ताह

राज्य सहकारी संघ आणि प्रतिष्ठान यांचे सहयोगाने सह्याद्री सभागृहात "वेद वड्मयातील सहकार" या विषयावर आदरणीय श्री बाळासाहेब भारदे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी श्री. मोहन धारिया होते

## माध्यमिक शाळांच्या मुख्याधपकांचे चर्चासत्र

सासवड येथे श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पुरंदर आणि प्रतिष्ठान, यांच्या सहयोगाने ६० माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे कृषी सहकार आणि ग्रामीण विकास या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

## डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे जन्मशताब्दी वर्ष

हा जन्मशताब्दीचा कार्यक्रम वर्षभर चालणार आहे. सहकार क्षेत्रातील प्रमुख संस्थांच्या सहयोगाने वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी १७ मार्च २००० रोजी श्री. मोहन धारिया यांच्या अध्यक्षतेखाली वनराईच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. पुढील वर्षात वेगवेगळे कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले आहे.

मुंबई

२२ मे २०००

विश्वस्त मंडळ/कार्यकारिणी

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती शारदा साठे |
| नवभारत युवा आंदोलन | संयोजक | श्री. प्रेमानंद रूपवते |
| | संघटक | श्री. दत्ता बाळसराफ |
| कृषि व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | संघटक | श्री. सुनिल वालावलकर |
| मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला उपक्रम | अध्यक्ष | श्री. सत्यरंजन धर्माधिकारी |
| | सचिव | श्री. एम.बी. पवार |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. व्ही.आर. कामत |
| | अतिरिक्त ग्रंथपाल | श्रीमती स्मिता केळकर |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण सभागृह माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन् |
| | प्रशिक्षण समन्वयक | श्री. मयुर परांजपे |
| पंचायत राज प्रशिक्षण प्रकल्प | आर्थिक सल्लागार | श्री. व्ही. गणपती |
| प्रथम - प्राथमिक शिक्षण उपक्रम | कार्यकारी सचिव | डॉ. माधव चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभु ॲण्ड असोशिएटस् |
| अभियांत्रीकी मानद सल्लागार | | श्री. के.जी. पै |
| सांविधानिक लेखा परीक्षक | | मे.के.बी. म्हेत्रे आणि कंपनी (२२-५-२००० पर्यंत) |
| अंतर्गत लेखा परीक्षक | | मे.पैंक्षे-कुलकर्णी आणि कंपनी |
| आयकर सल्लागार | | श्री. एल.एल. फडकर |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## प्रकाशित ग्रंथ

### विक्रीसाठी उपलब्ध

| | किंमत रुपये |
|---|---|
| १. यशवंतराव चव्हाण : विधीमंडळातील निवडक मराठी भाषणे (भाग १)<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| २. वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधीमंडळ (भाग २)<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. "सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट बाय वाय. बी. चव्हाण" (भाग १ व २)<br>संकलन :राम प्रधान (अमेय प्रकाशन, पुणे) | २५०.०० |
| ४. यशवंतराव चव्हाण मौलिक विचार<br>संकलन : ना. धों. मनोहर | ३.५० |
| ५. "सह्याद्रीचे वारे"<br>यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ६. म. फुले निवडक विचार<br>संकलन व संपादन : गजमल माळी | १२.०० |
| ७. बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास<br>संपादक : वि. स. पागे | ३५.०० |
| ८. महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन<br>संपादन : अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ९. महाराष्ट्र : "एक दृष्टीकोन" (श्री. शरदराव पवार - भाषण संग्रह)<br>संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास<br>संपादन : प्रा. पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. नवभारत : परिवर्तनाची दिशा<br>संपादक : प्रा. पी. बी. पाटील | ७५.०० |
| १२. "विमुक्तायन" महाराष्ट्रातील विमुक्त जमाती: चिकित्सक अभ्यास<br>संशोधक-लेखक - श्री. लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. महिला संबंधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल<br>लेखक - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. यशवंतराव चव्हाण (चरित्र)<br>लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

### निर्मित व्हिडिओ कॅसेट्स

१. प्रवासी पक्षी
(सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रजांच्या साहित्य जीवन कार्यावर आधारित)

२. तर्कतीर्थ जोशी
(तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या जीवन कार्यावर आधारित)

३. पुलवृत्तांत
(पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट.)

४. मी. एस. एम.
(एस.एम. जोशी यांच्या जीवनावर आधारित)

या चारही विषयाच्या व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांनी केली असून दिग्दर्शनाची संपूर्ण जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी पार पाडली.



कै. अरुण डहाणूकर - कोषाध्यक्ष

जन्म - २३ अप्रिल १९४५ मृत्यु - १९ मे २०००



२५ नोव्हेंबर १९९९ रोजी कराड येथे मान. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनाच्या कार्यक्रमाच्या वेळी.



महाराष्ट्र राज्य सहकार परिषद - पुणे सहकारी कायद्याची चर्चा :
श्री ज्ञानेश्वर खैरे दीप प्रज्वलीत करताना शेजारी सर्वश्री एस.टी. भीडे, मोहन धारिया, राम मेघे, सुभाष छठा, पी.आर. दुभाषी, रेड्डी व यशवंतराव मोहिते दिसत आहे.




नागपूर विभागीय केंद्रामार्फत नागपूर जिल्ह्यातील सरपंचासाठी आयोजित कलेले शिबीर.